RNI. REG. NO. MAHBIL/2023/86118
लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

दैनिक
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, नवी मुंबई, पुणे, रायगड, नाशिक, सातारा, कोल्हापूर

# लोकरक्षणाय

वर्ष ०३
अंक २७७
पृष्ठे ०८
रू. २/-

www.lokrakshanay.com
epaper.lokrakshanay.com
ठाणे, दिनांक शनिवार, ३१ जानेवारी २०२६

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ
dainiklokrakshanay@gmail.com
+91 97023 86118
@dainiklokrakshanay




उरणच्या हवा गुणवत्तेत सुधारणा
पान ३ वर

आरोग्य विशेष
हिवाळ्यात सूर्यनमस्कार करण्याचे...
पान ४ वर


**सुविचार**

"मोबाईल हातात आहे म्हणून जग कळतं असं नाही;
माणूस समजून घ्यायला संवेदनशील मन लागतं."

- संपादकीय


भारतातून गायब झालेल्या साता समुद्रापार असलेल्या तीन अमूल्य मूर्ती देशात येणार...
पान ८ वर



वाचकांसाठी खास उपक्रम - ध्यास+ (ध्यास सकारात्मकतेचा) पान ५ वर
विशेष उपक्रम


ध्यास सकारात्मकतेचा

## थोडक्यात

### महात्मा गांधी यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



मुंबई : राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त मंत्रालयाशेजारील उद्यानात महात्मा गांधींच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजलीही वाहण्यात आली. यावेळी आमदार अमीन पटेल, नगरसेवक ज्ञानराज नाईक, नगरसेविका राजेश्वरी पाटणकर, महात्मा गांधी स्मारक समितीचे महासचिव देवरा सिंग, सचिव सुमन पवार, प्रा. अमर सिंग यांच्यासह कुलाबा म्युनिसिपल सेकंडरी स्कूलचे विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.यावेळी सर्वधर्मीय प्रार्थना झाली. मर्झबान वाडिया यांनी पारसी, ज्युलिस क्रेझर यांनी ख्रिश्चन, मौलाना मझरूल इस्लाम यांनी मुस्लिम, दीपक क्षीरसागर यांनी बौद्ध, सोहन सिंग यांनी शिख, केशव चंद्र प्रभू यांनी हिंदू तर भरत जैन यांनी जैन धर्माच्या प्रार्थनेचे वाचन केले.

### परराज्यातील अवैध मद्य वाहतूकप्रकरणी कारवाई; १ कोटी ७२ लाखाचा मुद्देमाल जप्त

मुंबई : ठाणे जिल्ह्यातील मुंबई–नाशिक महामार्ग, सोनाळे गावच्या हद्दीत एच.पी पेट्रोल पंपाजवळ (ता. भिवंडी) परराज्यातील मद्याची वाहतूक करणाऱ्या वाहनावर २७ जानेवारी रोजी कारवाई करण्यात आली. या कारवाईत गोवा राज्यात निर्मित महाराष्ट्र राज्यात विक्रीस बंदी असलेल्या रॉयल ब्ल्यु माल्ट व्हिस्की ब्रॅण्ड मद्याचे १४०० बॉक्स अर्थात १८० मि.ली क्षमतेच्या ६७ हजार २०० बाटल्या दारूबंदी कायद्यातंर्गत जप्त करण्यात आल्या. तसेच आयशर कंपनीच्या एमएच ०४ एलवाय ४१३३ क्रमांक असलेल्या सहाचाकी वाहनासह, एक मोबाईल फोन असा एकूण १ कोटी ७२ लाख ९४ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत श्रवणकुमार कृष्णराम पंवार, रा. सगडवा, पो. डावल, ता. चीतलवाना, जि. जालोर (राजस्थान) यास अटक करण्यात आली आहे.

# महाराष्ट्रातील आयटीआय होणार सर्वोत्तम 'स्किल डेव्हलमपेंट हब' – मंत्री मंगलप्रभात लोढा

- राज्यातील आयटीआयचे आधुनिकीकरण,पीएम – सेतू योजना राबविणार
- पहिल्या टप्प्यात नागपूर,छत्रपती संभाजीनगर, पुणे यांचा समावेश
- केंद्र आणि राज्य सरकार मिळून २४२ कोटी खर्च करणार



● मुंबई, विशाल कारंडे :

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या शाश्वत विकासाच्या दूरदृष्टीच्या संकल्पनेतून आकाराला आलेल्या 'पीएम सेतू ' या योजनेमुळे महाराष्ट्रातील आयटीआय सर्वोत्तम 'स्किल डेव्हलमपेंट हब' होणार असल्याचे, राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी म्हटले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ही योजना सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे (आयटीआय) पीएम सेतू योजनेंतर्गत आधुनिकीकरण होणार असून पुढच्या टप्प्यात उर्वरित जिल्ह्यांचा समावेश करण्यात येणार आहे.

कुशल मनुष्यबळाची मागणी आणि पुरवठा यांच्यातील तफावत भरून काढण्यासाठी पीएम सेतू योजनेतून आयटीआयचे आधुनिकीकरण करण्याची योजना आहे. या योजनेच्या पहिल्या टप्पात नागपूर, छत्रपती संभाजी नगर आणि पुणे येथील आयटीआयचे आधुनिकीकरण केले जाणार आहे.

पान २ वर

## ठाण्यात महापौर, उपमहापौरांची झाली बिनविरोध निवड



● ठाणे, सम्यक कासारे :

ठाणे महापालिकेची निवडणूक युतीत लढविण्यात आली असल्यामुळे महापौर पद द्या अन्यथा विरोधी पक्ष म्हणून भूमिका बजावू, असा हट्ट धरणाऱ्या भाजपने अखेर माघार घेत शिवसेना (शिंदे गट) पक्षासोबत सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. शिवसेना (शिंदे गट) पक्षातर्फे महापौर पदासाठी शर्मिला पिंपळोलकर तर भाजपतर्फे उपमहापौर पदासाठी कृष्णा पाटील यांनी शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल केले असून त्यांच्याविरोधात उमेदवारी अर्ज दाखल झालेले नसल्यामुळे दोघांची बिनविरोध निवड झाली आहे.

पान २ वर

## अजित दादांच्या अकाली निधनानं पुणे जिल्ह्याचं काय?; कोण होणार पालकमंत्री?

● पुणे, शकील शेख :

राज्याचे उपमुख्यमंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानं राज्यभर शोककळा पसरली असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना मोठा धक्का बसला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पुणे जिल्ह्यात दबदबा असलेल्या आणि जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून जिल्ह्याचं काम पाहिलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या निधनानं आता पुणे जिल्ह्याचं काय? आणि पुणे जिल्ह्याचा पालकमंत्री कोण होणार? अशी सर्वत्र चर्चा सुरू आहे.

**पुणे जिल्ह्यावर राष्ट्रवादी काँग्रेसचा दबदबा :** तीन जिल्ह्यांचा पक्ष अशी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ओळख निर्माण करण्यात आली होती. कालांतरानं राज्यभर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विस्तार झाला. दरम्यान पक्षानं राज्यभर अनेक मातब्बर नेते पक्षानं घडवले. त्यांनी राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मोठ्या प्रमाणावर वाढवला. पुणे जिल्ह्यात अनेक वर्षापासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दबदबा आहे. पुणे जिल्ह्यात पक्षानं पंचायत समिती ते विधानसभा, लोकसभा निवडणुकीत मोठं यश मिळवलं. तसंच अनेक नेत्यांना जिल्ह्यात तयार करण्याचं काम पक्षानं केलं. प्रशासनावर पकड, दबदबा आणि विकासाचा अजेंडा घेऊन राज्याची जबाबदारी पार पाडत असताना अजित



पवार यांचं विशेष लक्ष पुणे जिल्ह्यात होता. जिल्ह्याच्या राजकारणात कोणत्या नेत्याला काय पद दिलं पाहिजे? काय केलं पाहिजे? यासाठी सतत अजित पवार काम करायचे. यासह ते दर आठवड्याला जिल्ह्याची बैठक घेत जिल्ह्याचे प्रश्न सोडवण्यावर भर देत होते.

**पुण्याचं पालकमंत्रीपद कोणाला मिळणार :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानं पक्षाची तसंच उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी सुनेत्रा पवारांनी घ्यावी, अशी राजकीय चर्चा सुरू आहे. असं असलं तरी जिल्ह्याचं काय? अशी देखील चर्चा सुरू झालेली पाहायला मिळत आहे. पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपद अजित पवार यांच्याकडं असल्यानं आता मुख्यमंत्री पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपद राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच देणार की याआधी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम पाहिलेले चंद्रकांत पाटील यांना पुण्याची जबाबदारी देणार हे पाहावं लागणार आहे.

पान २ वर

## जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी ५ ऐवजी ७ फेब्रुवारी रोजी मतदान; ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी

● मुंबई, विशाल पाटील :

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान; तर ७ फेब्रुवारी २०२६ ऐवजी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता.

पान २ वर

## UGC च्या नव्या नियमांना 'सुप्रीम' स्थगिती! दुरुपयोग होण्याची शक्यता असल्याचे निरीक्षण

**केंद्र सरकारला बजावली नोटीस; पुढील सुनावणी १९ मार्चला**

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) नवे नियम अस्पष्ट असून त्यांचा दुरुपयोग होऊ शकतो, असे निरीक्षण नोंदवून सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी यूजीसीच्या वादग्रस्त ठरलेल्या नियमांना स्थगिती दिली. या



प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली असून आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ही १९ मार्च रोजी होणार आहे. यूजीसीने लागू केलेल्या नव्या नियमांमवरून देशभरात आणि विशेष करून उत्तर भारतात संताप व्यक्त होत होता तसेच या नियमांविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने हा निर्णय दिला आहे.

**तरतुदी समानतेच्या अधिकारांच्या विरोधात**

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीवेळी याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितले की, यूजीसीच्या नियमांमधील कलम ३ सी हे जाती आधारित भेदभावाला केवळ एससी,

पान २ वर

## जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याचे लोणार सरोवर धोक्यात?; भूजल तज्ज्ञांनी सूचविले उपाय

● छत्रपती संभाजीनगर, दिगंबर जाधव :

जगप्रसिद्ध असलेल्या लोणार सरोवराचे अस्तित्व धोक्यात येणार असल्याची शक्यता गेल्या काही वर्षांपासून व्यक्त केली जात आहे. जागतिक स्तरावर खाऱ्या पाण्याचे सरोवर म्हणून लोणार सरोवराची आगळीवेगळी ओळख निर्माण झालेली आहे. गोड्याचे पाण्याचे प्रमाण वाढत असल्यानं सरोवराचे असलेले महत्त्व संपुष्टात येईल का, अशी भीती व्यक्त होत असतानाच त्यावरच्या उपाययोजना करण्यासाठी जलतज्ञ आणि भूजल तज्ञांनी अहवाल तयार केला आहे.

गेल्या काही वर्षात लोणार सरोवरात वाढत असलेल्या पाणी पातळीमुळे गोड्या पाण्याचे प्रमाण अधिक झालं आहे. त्यामुळे



खाऱ्या पाण्याचे सरोवर अशी मूळ ओळख पुसली जाण्याची भीती भूजल तज्ञ डॉ. अशोक तेजनकर यांनी व्यक्त केली. नुकतेच डॉ. तेजनकर यांनी या भागाचा सर्वेक्षण करून येणाऱ्या अडचणींची नेमकी कारणे काय आणि उपाय याबाबत सर्वेक्षण करून स्थानिक पातळीवर अहवाल सोपवला आहे.

**पर्यटनावर मोठा परिणाम -** जागतिकस्तरावरील पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाणारे लोणार सरोवर हे बुलढाण्यात आहेत. खाऱ्या पाण्याचे सरोवर पाहण्यासाठी देश-विदेशातून नागरिक दाखल होत असतात. त्याचबरोबर काठावर असलेले कुमारेश्वर, यज्ञेश्वर, महादेवी मंदिर, बगीचा महादेव, देशमुख महादेव, अंबरखाना, कमळजा मंदिरासारखे मंदिर पर्यटकांना भुरळ घालत असल्यानं मोठी गर्दी याठिकाणी दिसून येत होती. मात्र, सरोवराच्या पाणी पातळीत मागील काही वर्षात झपाट्यानं वाढ झाल्यानं पाण्यातील खारेपण कमी झाले. त्यामुळे हा बहुतांश सर्व परिसर पाण्याखाली गेल्यानं स्थानिक पर्यटन उद्योगावर मोठा परिणाम झाला आहे.

**सरोवरातील भूजल पातळीत वाढ-** भूजल हे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहत राहते. पाणी स्थिर नसल्यानं भूजल परिस्थिती काही वेळेनंतर बदलत राहते.

पान २ वर

## १ फेब्रुवारीपासून मुंबईत नवीन वाहतूक नियम; कोंडी कमी करण्यासाठी निर्णय

● मुंबई, राकेश गायकवाड :

मुंबईतील वाढती वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मुंबई वाहतूक पोलिसांनी १ फेब्रुवारीपासून शहरात नवीन वाहतूक नियम लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या नियमांनुसार शहरात जड वाहनांच्या प्रवेशावर वेळेचे कडक निर्बंध घालण्यात आले आहेत.

**पीक अवर्समध्ये जड वाहनांना बंदी**

नव्या आदेशानुसार,

- सकाळी ८ ते ११
- सायंकाळी ५ ते रात्री ९

या वेळेत मुंबईत जड वाहनांना प्रवेश दिला जाणार नाही. या वेळा वाहतुकीच्या दृष्टीने सर्वाधिक गजबजलेल्या असल्याने मोठ्या वाहनांमुळे अपघाताचा धोका वाढतो आणि कोंडी तीव्र होते, असे पोलिसांचे म्हणणे आहे.

**दक्षिण मुंबईत अधिक कठोर नियम**

दक्षिण मुंबईत (साऊथ मुंबई) नियम आणखी



कडक असणार आहेत.

- सकाळी ७ ते रात्री १२ या वेळेत सर्व जड वाहनांना पूर्ण बंदी
- फक्त अत्यावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या वाहनांना परवानगी
- जड वाहनांना प्रवेश फक्त रात्री १२ ते सकाळी ७ या वेळेतच मिळणार

लक्झरी बसनाही या भागात बंदी राहणार आहे, मात्र अत्यावश्यक सेवा देणारी वाहने अपवाद असतील.

**ईस्टर्न फ्रीवेवर दिवसरात्र बंदी**

पान २ वर

## ई-मोजणी व्हर्जन २ साठी पुण्यात नागरिकांसाठी मदत कक्ष

जमीन मोजण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या भूमी अभिलेख विभागाच्या ‘ई-मोजणी व्हर्जन’ दोनमध्ये अर्ज करताना नागरिकांना येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाने स्वतःहून पुढाकार घेतला आहे. त्यासाठी जिल्ह्यातील हवेली, मावळ, मुळशी व पिंपरी-चिंचवड या कार्यालयांत नागरिकांसाठी मदत कक्ष स्थापन केला आहे. मोजणी अर्ज भरण्यापासून ते प्रकरण निकाली निघेपर्यंत आवश्यक सर्व मदत या कक्षाद्वारे नागरिकांना मोफत मिळणार आहे.

# प्रजासत्ताकाची खरी कसोटी

आज अनेक राष्ट्रे कागदोपत्री स्वतःला लोकशाही म्हणवतात. निवडणुका घेतल्या जातात, मतदानाचा हक्क दिला जातो आणि अभिव्यक्तीस्वातंत्र्याची हमीही दिलेली असते. मात्र या साऱ्या प्रक्रियांपलीकडे जाऊन विचार केला, तर खरोखरच सत्ता जनतेकडे आहे का, की ती केवळ नावापुरती लोकशाही असून प्रत्यक्षात काही मोजक्या घटकांच्या हातात केंद्रीत झाली आहे, हा मूलभूत प्रश्न उभा राहतो.

लोकशाहीतील सर्वांत महत्त्वाचा आधार म्हणजे निवडणूक प्रक्रिया. मतदानाद्वारे नागरिक आपले मत व्यक्त करतात आणि राज्यकर्ते ठरवतात. या टप्प्यावर प्रजेच्या हाती सत्ता आहे, असे वाटते; पण निवडणुका पार पडल्यानंतर सामान्य नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग किती उरतो, याचे उत्तर समाधानकारक नाही. मागील काही काळात देशात विविध निवडणुका झाल्या आणि सत्तांतर घडले; परंतु आजच्या राजकारणाचे वास्तव पाहिले, तर निवडणूक लढवणे अत्यंत खर्चिक बनले आहे. मोठ्या प्रमाणावर लागणारा निधी पाहता सामान्य माणसापेक्षा उद्योगपती, श्रीमंत वर्ग किंवा राजकीय घराणी यांनाच सत्तेपर्यंत पोहोचणे सोपे जाते. परिणामी, निवडून आलेले प्रतिनिधी जनतेपेक्षा अर्थसहाय्य करणाऱ्या गटांच्या हिताकडे अधिक झुकतात. अशा परिस्थितीत लोकसत्ता आर्थिक शक्तीसमोर दुबळी ठरण्याचा धोका निर्माण होतो.

प्रजासत्ताकाचे दुसरे महत्त्वाचे स्तंभ म्हणजे अभिव्यक्तीस्वातंत्र्य. नागरिकांना मोकळेपणाने मत मांडता येणे आणि सत्तेवर टीका करता येणे, हे खऱ्या लोकशाहीचे लक्षण आहे. अनेक देशांत हे स्वातंत्र्य घटनात्मकरीत्या मान्य असले, तरी प्रत्यक्ष व्यवहारात विरोधी आवाज दाबले जातात, खटले दाखल होतात किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून बदनामी केली जाते. भारतासह जगभरात अलीकडच्या काळात अशा घटनांची उदाहरणे वाढली आहेत. तरीही इतिहास साक्ष देतो, की संघटित आणि जागरूक जनतेने अनेकदा सत्ताधाऱ्यांना माघार घ्यायला भाग पाडले आहे. भारताचा स्वातंत्र्यलढा, पाश्चात्त्य देशांतील नागरी हक्क चळवळी, अरब देशांतील आंदोलने तसेच पर्यावरण, महिलांचे हक्क आणि शेतकरी प्रश्नांवरील चळवळी यामुळे हे स्पष्ट झाले आहे. न्यायालये, लोकपाल संस्था आणि माहिती अधिकार कायदा यांसारखी साधनेही जनतेच्या सत्तेला बळकटी देतात.

खरे तर प्रजासत्ताक ही एक स्थिर अवस्था नसून सतत जपावी लागणारी प्रक्रिया आहे. नागरिकांची जागरूकता, शिक्षण, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि सक्रिय सहभाग यांवर तिचे भवितव्य अवलंबून असते. जनता निष्क्रिय झाली आणि उदासीनता वाढली, तर सत्ता लोकांच्या हातातून हळूहळू निसटते. उलट, सजग नागरिक लोकशाही अधिक सशक्त करतात.

आजच्या काळात पर्यावरणीय संकटे, हवामानबदल आणि नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास ही सुदृढ प्रजासत्ताकासाठी मोठी आव्हाने आहेत. डिजिटल युगात माहितीचा वेग प्रचंड वाढला असला, तरी त्याचबरोबर खोटी माहिती, द्वेषमूलक प्रचार आणि जनमताची दिशाभूल यांचा धोका वाढला आहे. अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल राखणे हे आधुनिक भारतीय प्रजासत्ताकासमोरील महत्त्वाचे आव्हान ठरत आहे.

भारतीय प्रजासत्ताकाची वाटचाल आशा आणि संघर्ष यांच्या संमिश्र अनुभवांनी घडलेली आहे. अनेक अडथळ्यांनंतरही भारताने लोकशाही, संविधान आणि स्वातंत्र्य या मूल्यांवर आपला विश्वास टिकवून ठेवला आहे. आव्हाने मोठी असली, तरी ती अजिंक्य नाहीत. जागरूक नागरिक, सक्षम संस्था आणि संविधानिक मूल्यांवरील श्रद्धा यांमुळे भारताचे प्रजासत्ताक अधिक मजबूत होऊ शकते. प्रजासत्ताक ही केवळ शासनव्यवस्था नसून सतत जपायची जीवनदृष्टी आहे, आणि तिची जबाबदारी प्रत्येक नागरिकावर आहे.

एकविसाव्या शतकात भारत जागतिक राजकारण, अर्थव्यवस्था आणि सामाजिक चर्चांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. माहिती-तंत्रज्ञान, स्टार्टअप संस्कृती, डिजिटल व्यवहार, अवकाश संशोधन आणि औषधनिर्मिती या क्षेत्रांत भारताने आपली क्षमता सिद्ध केली आहे. ‘मेक इन इंडिया’, ‘डिजिटल इंडिया’ आणि ‘आत्मनिर्भर भारत’सारख्या उपक्रमांनी विकासाला चालना दिली आहे; मात्र या प्रगतीसोबत बेरोजगारी, उत्पन्नातील विषमता, ग्रामीण संकटे आणि असंघटित कामगारांचे प्रश्नही तितकेच गंभीर आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेचा भाग बनताना पर्यावरणीय शाश्वतता, कामगार हक्क आणि सामाजिक सुरक्षितता यांचा समतोल राखणे अपरिहार्य ठरणार आहे.

आज भारतासमोर अमाप संधी आहेत, तसेच मोठी जबाबदारीही आहे. लोकसंख्या, लोकशाही आणि अर्थव्यवस्था यांचा समन्वय साधता आला, तर भारत जागतिक नेतृत्व करू शकतो. मात्र त्यासाठी आत्मस्तुतीपेक्षा आत्मपरीक्षण अधिक आवश्यक आहे. समावेशक समाजव्यवस्था, लोकशाही मूल्यांवर आधारित राजकारण आणि न्याय्य विकासाचा मार्ग स्वीकारला, तरच भारताची ओळख केवळ उदयोन्मुख महासत्ता म्हणून नव्हे, तर जबाबदार आणि विश्वासार्ह जागतिक शक्ती म्हणून निर्माण होईल. आज जग भारताचा आवाज गांभीर्याने ऐकत आहे; प्रश्न इतकाच आहे, की हा आवाज मूल्यांचा, समतेचा आणि दीर्घकालीन मानवकल्याणाचा असेल का?

- अनिकेत घनश्याम भंकाळ

**संपादकीय**

## वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्रह्मानंद नाईकवाडी निलंबित; ४ दिवसांपूर्वीच पोलीस नियंत्रण कक्षात झाली होती बदली

**नवी मुंबई (भावना जैन) :** कामात कुचराई आणि रंगाई केल्याच्या आरोपांमुळे नेरूळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ब्राह्मनंद नाईकवाडी यांना निलंबित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, केवळ चार दिवसांपूर्वीच त्यांची बदली पोलीस नियंत्रण कक्षात करण्यात आली होती.

मिळालेल्या माहितीनुसार, २३ जानेवारी रोजी त्यांची बदली नियंत्रण कक्षात करण्यात आली होती. मात्र, त्याच वेळी त्यांच्या कामकाजाबाबत उपायुक्त कार्यालयाकडून गोपनीय चौकशी सुरू होती. चौकशीत काही गंभीर बाबी समोर आल्याने अखेर त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचे समजते.

नेरूळ परिसरातील एका भूखंड व्यवहारातील फसवणुकीची तक्रार गांभीर्याने न घेता प्रकरण प्रलंबित ठेवणे, तसेच संबंधित संशयितांविरोधात गुन्हा नोंद करण्याऐवजी अर्ज निकाली काढणे, या बाबी त्यांच्या अंगाशी आल्याची चर्चा आहे. याशिवाय, एका गंभीर गुन्ह्यातील संशयित आरोपीच्या जामीन अर्जाच्या सुनावणीवेळी स्वतः न्यायालयात हजर न राहता कनिष्ठ अधिकाऱ्याला पाठवण्यात आल्याची बाबही त्यांच्या विरोधात नोंदवण्यात आली आहे.

दरम्यान, १६ जानेवारी रोजी निवडणुकीच्या निकालानंतर नेरुळ येथे एका पराभूत उमेदवाराच्या कार्यालयात घुसून मारहाण व तोडफोड केल्याची घटना घडली होती. या प्रकरणातही वरिष्ठ पातळीवर अपेक्षित ती कडक कारवाई झाली नसल्याची नोंद चौकशीत झाल्याचे सूत्रांनी सांगितले. या सर्व बाबींचा एकत्रित आढावा घेत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी निलंबनाची कारवाई केल्याचे समजते.

## ‘त्या’ प्रकरणात आर्यन खानला उच्च न्यायालयाचा दिलासा; समीर वानखेडेंची याचिका फेटाळली

**नवी दिल्ली(प्रगती शर्मा) :** बॉलीवडू अभिनेता शाहरूख खान यांचा मुलगा आर्यन खान दिग्दर्शित "बॅड्स ऑफ बॉलिवूड" या वेब सीरिजमुळे आपली प्रतिमा मलिन झाली असल्याचा आरोप करत मानहानीचा खटला दाखल करणारे आयआरएस अधिकारी समीर वानखेडे यांची याचिका फेटाळून दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांना गुरुवारी चांगलाच दणका दिला. समीर वानखेडेंनी आर्यन खान दिग्दर्शित वेब सीरिजमध्ये आपली प्रतिमा मलिन करण्यात आल्याचा आरोप केला होता. या सीरिजमधील काही दृश्यांमधून आपला अप्रत्यक्षपणे अपमान करण्यात आल्याचे नमूद करून वानखेडेंनी दिल्ली उच्च न्यायालयात शाहरुख खान, गौरी खान, नेटफ्लिक्स इंडिया आणि रेड चिलीजविरुद्ध मानहानीचा खटला दाखल केला होता.समीर वानखेडेंनी या खटल्यात २ कोटी रुपयांची नुकसानभरपाई, तसेच सीरिजमधून ड्रग्स केसशी संबंधित कंटेंट तात्काळ हटवण्याची मागणी केली होती. या रकमेचा वापर टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलला दान करण्याचा दावा त्यांनी केला होता.

वानखेडेंनी सीरिजमधील एका दृश्यावर विशेष आक्षेप घेतला होता. या दृश्यात एक नार्कोटिक्स अधिकारी नशा करत असलेल्या डीजेजवळ जातो, नंतर तो एका तरुणाकडे इशारा करत म्हणतो की, “तो स्टार किड नाही” आणि मस्ती करत असलेल्या त्या स्टार किडला ताब्यात घेतो. या दृश्यातून आपल्याला लक्ष्य केले असून, आपली बदनामी करण्यात आल्याचा दावा समीर वानखेडेंनी केला होता.ऑक्टोबर २०२१ मध्ये समीर वानखेडेंनी मुंबई क्रूझ ड्रग्स प्रकरणात आर्यन खानला अटक केली होती. मात्र नंतर आर्यन खान यांना या प्रकरणात ड्रग्सच्या आरोपांतून मुक्त करण्यात आले.

## पान १ वरुन

### महाराष्ट्रातील आयटीआय होणार...

**केंद्र आणि राज्य सरकार मिळून २४२ कोटी खर्च :** आयटीआयच्या आधुनिकीकरणासाठी हब अँड स्पोक प्रारूप विकसित केले जाणार आहे. या योजनेत केंद्र आणि राज्य सरकार मिळून २४२ कोटी खर्च करणार असून यामुळे राज्यातील आयटीआयचे रूप पालटणार आहे. या आधुनिकीकरणामुळे तरुणांना विविध क्षेत्रात दर्जेदार व्यावसायिक संधी उपलब्ध होणार आहे. या योजनेची पुढच्या वर्षात टप्प्या-टप्प्याने अंमलबजावणी करण्यासही मान्यता देण्यात आली. योजनेकरिता केंद्र सरकारचा ५० टक्के, राज्य सरकारचा ३३ टक्के आणि उद्योग क्षेत्राचा १७ टक्के निधी असेल. आयटीआयच्या आधुनिकीकरणासाठी वरील प्रमाणे निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. राज्यात एका क्लस्टरकरिता (१ हब आयटीआय व ४ स्पोक आयटीआय) पाच वर्षांकरीता अंदाजित २४१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्याकरिता केंद्र सरकारचे ११२ कोटी रुपये, राज्य शासनाचे ९८ कोटी रुपये आणि उद्योग क्षेत्राचा ३१ कोटी रुपयांचा वाटा असेल. त्यापैकी राज्य शासनाकडून पाच वर्षांकरिता करावयाच्या ९८ कोटी रुपयांच्या खर्चासही मान्यता देण्यात आली आहे.

**पहिल्या टप्प्यात नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पुणे यांचा समावेश**

नागपूर येथील गव्हर्न्मेंट आयटीआय, नागपूर आयटीआयचे हब म्हणून आधुनिकीकरण केले जाईल. मुलींसाठीचे आयटीआय, नागपूर, कामटी, हिंगणा आणि बुटीबोरी येथील आयटीआयचा समावेश आहे. छत्रपती संभाजी नगर येथील आयटीआय हब म्हणून आधुनिकीकरण करणार. त्याचबरोबर पैठण, खुल्ताबाद, गंगापूर आणि फुलंब्री येथील आयटीआयचेही आधुनिकीकरण केले जाणार आहे. पुण्यातील औंध येथील आयटीआयचा हब म्हणून आधुनिकीकरण केले जाणार. औंध येथील मुलींसाठीचे आयटीआय, खेड-राजगुरूनगर आणि मुळशी येथील आयटीआयचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे.

**नवीन अभ्यासक्रमासह विद्यमान अभ्यासक्रमातही सुधारणा**

एका हब आयटीआयमध्ये सरासरी चार नवीन अभ्यासक्रम सुरू केले जाणार असून, दहा विद्यमान अभ्यासक्रमांची श्रेणी सुधारणा केली जाणार आहे. स्पोक आय़टीआयमध्ये दोन नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत तर आठ अभ्यासक्रमांची श्रेणी सुधारणा केली जाणार आहे. उद्योगांची संख्या कमी असलेल्या ठिकाणी सेवा क्षेत्र, बहुकौशल्य अभ्यासक्रम आणि उपजिविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत.

गुरुकुल परंपरा, नालंदासारखी विद्यापीठे आणि आर्यभट्टांसारखे विद्वान यांच्यामुळे भारत ज्ञानार्जनाचे जागतिक केंद्र म्हणून उदयास आले. आज त्या ज्ञानपरंपरेलाच अनुसरून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आधुनिक कौशल्य प्रशिक्षणाची जोड देत आयटीआयच्या माध्यमातून नवा भारत घडवण्याचा प्रयत्न करत असल्याचेही मंत्री लोढा यांनी स्पष्ट केले आहे.

### ठाण्यात महापौर, उपमहापौरांची...

येत्या ३ फेब्रुवारीला केवळ अधिकृत निवडीची औपचारीकता शिल्लक राहिलेली आहे.

ठाणे महापालिका निवडणुकीत शिंदेच्या शिवसेनेचे ७५, भाजपचे २८, राष्ट्रवादी (शरद पवार) १२, राष्ट्रवादी (अजित पवार) ९, एमआयएम ५, शिवसेना (उबाठा) १, अपक्ष १ असे १३१ नगरसेवक निवडून आले आहेत. या निवडणुक निकालानंतर ३ फेब्रुवारी रोजी महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणुक जाहीर झाली. शिंदे गटाच्या शिवसेनेने ७५ नगरसेवक निवडून आणले असून, एका अपक्ष नगरसेवकाने पाठिंबा दिल्यामुळे हे संख्याबळ ७६ वर गेले आहे. ठाणे महापालिकेत सत्तास्थापनेसाठी ६६ नगरसेवकांचे संख्याबळ आवश्यक आहे. त्यामुळे शिंदे सेनेचा महापौर होणार हे जवळपास निश्चित मानले जात होते.

ठाणे महापालिका महापौर पदासाठी अनुसूचित जातीचे आरक्षण जाहीर झाल्यामुळे शिंदे सेनेतील आठ नगरसेवकांच्या नावाची चर्चा होती. शिंदेच्या शिवसेनेकडून अनुसूचित जाती प्रवर्गातील तब्बल सात नगरसेवक निवडून आले आहेत. यामध्ये प्रभाग ३ (अ) मधील पद्मा भगत, ६ (अ) मधील वनिता घोगरे, ७ (अ) मधील विमल भोईर, ९ (अ) मधील गणेश कांबळे, १६ (अ) मधील डॉ. दर्शना जानकर, २४ (अ)मधील आरती गायकवाड आणि २८ (अ)मधील दीपक जाधव यांचा समावेश होता. या सात जणांसह कोपरी येथील सर्वसाधारण प्रभागातून निवडणूक लढवलेल्या शर्मिला पिंपोळकर यांचेही नाव चर्चेत होते. यापैकी शर्मिला पिंपळोलकर यांच्या नावावर पक्षाने अखेर शिक्कामोर्तब केला. तर, भाजपने उपमहापौर पदासाठी कृष्णा पाटील यांची निवड केली. महापौर, उपमहापौर निवडणुकीसाठी ३० जानेवारी रोजी दुपारी २ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत होती. या दिवशी महापौर पदासाठी शिंदेच्या शिवसेनेतर्फे शर्मिला पिंपळोलकर यांनी अर्ज दाखल केला तर, भाजपातर्फे उपमहापौर पदासाठी कृष्णा पाटील या अर्ज दाखल केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हे अर्ज दाखल करण्यात आले. त्यांच्याविरोधात उमेदवारी अर्ज दाखल झालेले नसल्यामुळे दोघांची बिनविरोध निवड झाली आहे. येत्या ३ फेब्रुवारीला केवळ अधिकृत निवडीची औपचारीकता शिल्लक राहिलेली आहे.ठाणे महापालिकेची निवडणूक युतीत लढविण्यात आली असल्यामुळे महापौर पद भाजपला देण्याचा प्रस्ताव भाजपने शिंदे गटाच्या शिवसेनेपुढे मांडला होता. महापौर पद मिळाले नाहीतर विरोधी पक्षाची भूमिका बजावू, असे इशारे भाजपने दिले होते. मात्र, शिंदे सेना महापौर पद सोडण्यास नकार दिला. त्याऐवजी पाच वर्षांच्या कालावधीत पहिले व शेवटचे सव्वा वर्ष उपमहापौर पद, तीन प्रभाग समित्या आणि दोन विशेष समित्या भाजपला देण्याची तयारी शिंदे सेनेने दर्शविली. भाजपनेही यासोबत स्थायी समिती आणि परिवहन समितीचे सभापती पद प्रत्येकी एक वर्ष देण्याची मागणी केली. दरम्यान, दोन्ही पक्षाच्या नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर भाजपने महापौर पदाचा हट्ट सोडत शिंदेंच्या सेनेसोबत सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

**कोपरीला पहिल्यांदा महापौर पद**

ठाणे, वागळे इस्टेट परिसरातील नगरसेवकांना आजवर महापौर पदे मिळाली. ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के हे आनंदनगर भागातून नगरसेवक निवडून येत होते. हा कोपरी परिसराचा भाग असला तरी तो वागळे इस्टेट परिसराशी जोडण्यात आला होता. यामुळे म्हस्के हे महापौर झाले, तेव्हा हे पद वागळे विभागाकडे गेले होते. कोपरी भागाला अद्याप महापौर पद मिळाले नव्हते. गोपाळ लांडगे यांचे यापुर्वी नाव चर्चेत येऊनही ते महापौर होऊ शकले नव्हते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोपरी भागातून निवडून येणाऱ्या शर्मिला पिंपळोलकर यांना महापौर पदाची उमेदवारी दिली असून या निमित्ताने कोपरीला पहिल्यांदा महापौर पद मिळाले आहे.

### अजित दादांच्या अकाली निधनानं...

**राजकीय वर्तुळात विविध चर्चा :** पुणे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक नेते आहेत. राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडं वाशिम जिल्ह्याचं पालकमंत्रीपद आहे. त्यामुळं त्यांना पुणे जिल्ह्याची जबाबदारी देण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडं ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांना देखील कामाचा अनुभव असल्यानं त्यांना याची जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. राज्याच्या राजकारणात पुणे जिल्ह्याची एक वेगळी ओळख असल्यानं अनुभवी असा चेहरा पालकमंत्री म्हणून मिळावा अशी चर्चा सुरू आहे. यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं गेल्या काही काळापासून पुणे जिल्ह्यावर असलेलं विशेष लक्ष पाहता ते त्यांच्याकडं पुणे जिल्ह्याची जबाबदारी ठेवणार असल्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी चर्चा राजकीय वर्तुळात होताना पाहायला मिळत आहे.

### जिल्हा परिषद व पंचायत...

त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी ३१ जानेवारी २०२६च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात २८ जानेवारी २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना ३१ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करतील. आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता होईल. संबंधित ठिकाणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

### UGC च्या नव्या नियमांना...

एसटी आणि ओबीसींपर्यंतच मर्यादित करते, तसेच सामान्य वर्गाला या तरतुदींच्या बाहेर ठेवते. ही बाब कलम १४ मध्ये देण्यात आलेल्या समानतेच्या अधिकारांच्या विरोधात आहे. त्याचप्रमाणे ही व्याख्या घटनेची भावना आणि सर्वोच्च न्यायालयाच्या जुन्या आदेशांच्या विरोधात आहे. या नियमांमुळे समाजात वैमनस्य वाढेल, असा दावाही याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला. त्यानंतर सरन्यायाधीशांनी स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षांनंतरही आपण समाजाला जातीपातींपासून मुक्त करू शकलेलो नाही, आता या कायद्यांमधून आपण समाजाला आणखी मागे घेऊन जात आहोत का, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी केली.

**नव्या नियमांमुळे रॅगिंग वाढण्याची भीती**

दरम्यान, नव्या नियमांमुळे रॅगिंग वाढणार असून, रॅगिंग करणारे विद्यार्थी तक्रारही करतील, अशी भीती याचिकाकर्त्यांनी व्यक्त केली. त्यावर न्या. बागची यांनी सांगितले की, राज्यघटना राज्याला एससी एसटींसाठी विशेष कायदे बनवण्याचा अधिकार देते. जर २०१२ च्या नियमांमध्ये व्यापक संरक्षण देण्याचा उल्लेख करण्यात आला असेल तर समाजिक न्यायाचे संरक्षण करणाऱ्या कायद्यांमध्ये बचावाचे उपायही असले पाहिजेत. अमेरिकेप्रमाणे शाळांनाच वेगळे करण्याच्या पातळीपर्यंत आपण जाता कामा नये, असेही न्यायमूर्तींनी स्पष्ट केले.

### जगप्रसिद्ध खाऱ्या पाण्याचे लोणार...

त्यात, काही ठिकाणी पाणी वाढते. तर काही ठिकाणी कमी होते, हे प्रामुख्याने पाहायला मिळते. मागील पंधरा वर्षांमध्ये लोणार सरोवरच्या ठिकाणीदेखील असेच काहीसे बदल पाहायला मिळते. स्थानिक लोकांनी पाणी मिळवण्यासाठी असो किंवा प्रशासनानं पाण्याच्या नियोजनासाठी भूपातळीवर केलेल्या प्रयोगामुळे तेथील भूजल पातळी वाढलेली दिसून येत आहे. यामध्ये जलसंधारणाची कामे, तलाव, विहिरी आणि बोअरवेल घेणे अशी कामे करताना खोली खूप मोठ्या प्रमाणात आहे. तसेच लोणार सरोवरात बेसॉल्ट खडक असल्यानं काही मर्यादा आहेत. त्यावर प्रयोग झाल्यानं त्याचा परिणाम असल्याचे मत भूजल तज्ञ डॉ. अशोक तेजनकर यांनी व्यक्त केलं.

**झरे पुनर्जीवित झाले-** पाण्यासाठी अनेकांनी बोअर घेताना त्याची खोली ७०० फूट पर्यंत घेण्यात आली आहे. त्यात उभे आडवे बोअर मारल्यानं पाण्याचे मृत झरे पुनर्जीवित झाले. जमिनीवर केलेल्या बदलांमुळे जमिनीच्या आत परिणाम झाले. त्यात सुरू झालेले खारे आता त्या सरोवरमध्ये येऊन मिळू लागल्यानं परिणामी तेथील पाणी पातळीत वाढ होत आहे. पूर्वी काही प्रमाणात आलेले पाणी आसपासच्या शेतांमध्ये जमा होऊन तिथेच मुरायचं. मात्र, काही वर्षांमध्ये त्याचे प्रमाण वाढून पाणी तलावात जात असल्यानं लोणार सरोवराचे अस्तित्व अडचणीत सापडले असल्याचं मत अभ्यासक तथा जलतज्ञ डॉ अशोक तेजनकर यांनी व्यक्त केलं. त्यासाठी काही तातडीच्या आणि दीर्घकालीन उपाययोजना आहेत. त्यानुसार काम केल्यास परिस्थिती नियंत्रणात आणता येतील, असेदेखील त्यांनी सांगितलं.

"लोणार सरोवर हे खाऱ्या पाण्यासाठी प्रसिद्ध आहे. मात्र, तेथील पाणी पातळीत होणाऱ्या वाढीमुळे गोडे पाणी मोठ्या प्रमाणात वाढत चाललं आहे. याचा परिणाम म्हणून सरोवराची ओळख पुसली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मात्र, त्यासाठी भूशास्त्र सर्वेक्षण करून येणाऱ्या पाण्याच्या झऱ्यांची लांबी-रुंदी यांचा अभ्यास करून उपाय योजना करता येईल. तर येणारे पाणी दुसऱ्या बाजूला वळवून किंवा पाणी तिथून काढून टाकता आले तर लोणार सरोवर आणि परिसरातील इतर वास्तू वाचवणं शक्य होईल. तशा उपाययोजना स्थानिक पातळीवर कळविलं आहे", अशी माहिती अभ्यासक आणि जलतज्ञ डॉ. अशोक तेजनकर यांनी दिली.

### १ फेब्रुवारीपासून मुंबईत नवीन...

-मुंबईच्या ईस्टर्न फ्रीवेवर जड वाहनांना पूर्णतः बंदी राहील.

-फक्त बस सेवा याला अपवाद असणार आहेत.

**कोणती वाहने सुरू राहतील?**

खालील वाहनांना बंदीतून सूट देण्यात आली आहे –

- भाजीपाला, दूध, ब्रेड, बेकरी पदार्थ
- पिण्याचे पाणी
- पेट्रोल, डिझेल, रॉकेल
- रुग्णवाहिका
- शालेय बस
- शासकीय व निमशासकीय वाहने
- **लक्झरी बसना शहरात परवानगी असेल, मात्र दक्षिण मुंबईत नाही.**

**पार्किंग नियमही कडक**

जड वाहनांना –

- फक्त खाजगी, भाड्याच्या किंवा अधिकृत पे- अँड-पार्किंगमध्येच वाहन लावता येईल
- सार्वजनिक रस्त्यांवर पार्किंगला मनाई
- पाणी पुरवठा ठिकाणांजवळ फक्त दोन पाण्याचे टँकर थांबू शकतील

**वाहतूक पोलिसांचे स्पष्टीकरण**

“हळू गतीने चालणारी जड वाहने पीक अवर्समध्ये वाहतूक ठप्प करतात. या नियमांचा उद्देश सामान्य नागरिकांचा प्रवास सुकर करणे हा आहे.” असे वाहतूक पोलिसांनी सांगितले आहे.

**ट्रान्सपोर्ट संघटनांचा विरोध**

मात्र, या निर्णयावर ट्रान्सपोर्ट संघटनांनी नाराजी व्यक्त केली आहे. ऑल इंडिया मोटर ट्रान्सपोर्ट काँग्रेसचे अध्यक्ष बाल मलकित सिंग यांनी सांगितले की, “या बंदीमुळे दक्षिण मुंबईतील कामकाजावर परिणाम होईल. केवळ अत्यावश्यक वाहनांनाच परवानगी दिल्यास भ्रष्टाचाराला वाव मिळू शकतो. ट्रक हे फिरण्यासाठी नसून गरजेच्या कामासाठीच रस्त्यावर असतात.”दरम्यान, वाढती वाहनसंख्या आणि सुरू असलेली मोठी पायाभूत कामे लक्षात घेऊनच हा निर्णय घेण्यात आल्याचे मुंबई वाहतूक पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

Printed, Published and Owned by Rakesh Shankar Gore and Printed at Somani Printing Press, Unit no.04, Ground Floor, N.K. Industrial Estate, off. Aarey Road, near Pravasi Ind. Estate, Gate no.2, Goregaon (east) Mumbai-400063, and Published at Shop no. १२, B-2, Sai Dham Shopping Center, Mangal Nagar,१५ No. Last Bus Stop, Near G.C.C. Club, Mira Road (east), Dist: Thane-401107, Maharashtra. Editor- Rakesh Shankar Gore. RNI REG. No: MAHBIL/2023/86118. Office Contact no. 9702386118, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Website: www.lokrakshanay.com (ठाणे न्याय कक्षेत)

**कोरोनानंतर महाराष्ट्रात कुष्ठरोगाचे पुन्हा आवाहन**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षांच्या पाराज्यात कुष्ठरोगाचे प्रमाण २००४ मध्ये प्रति १० हजार लोकसंख्येमागे एकापेक्षा कमी झाले. त्यावेळी राज्य सरकारने कुष्ठरोगाचे 'निर्मूलन' झाल्याची अधिकृत घोषणा केली होती. मात्र, कोरोनानंतरच्या काळात कुष्ठरोगाचे पुन्हा आव्हान निर्माण झाले आहे. कुष्ठरोगाच्या नियंत्रणासाठी नियमित तपासणी आणि सातत्यपूर्ण उपचार आवश्यक असल्याचे मत वैद्यकतज्ज्ञांनी नोंदवले आहे.

# उरणच्या हवा गुणवत्तेत सुधारणा

**उरण (भावना जैन) :** मंगळवारी पहाटे पडलेल्या पावसाच्या शिडकाव्यामुळे उरणच्या हवा गुणवत्तेत सुधारणा झाली आहे. पावसाच्या सरींमुळे तसेच येथील विविध उद्योगाकडून हवा गुणवत्ता निर्देशांक कमी करण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचाही परिणाम झाला आहे. त्यामुळे गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा झाली असून गुरुवारी हा निर्देशांक ७० ते १०० दरम्यान नोंदविला गेला. त्यामुळे वातावरण दोन दिवस आल्हाददायक बनले होते.

हवेतील वाढते धूलिकण आणि तापमानामुळे उरणच्या हवा गुणवत्ता निर्देशांकात सतत वाढ होत होती. ही मात्रा ८० ते १५० पेक्षा अधिक नोंदविली होती. मात्र सरीमुळे हवा गुणवत्ता निर्देशांकात सुधारणा झाली आहे.

उरणच्या वाढत्या हवा प्रदूषण, तापमान आणि आर्द्रतेचा येथील नागरिकांच्या शरीरावर हानिकारक परिणाम होऊ लागला आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून उरण यामध्ये २०० पेक्षा वर हवेचा निर्देशांक नोंदविण्यात येत होता. ही हवेची प्रदूषित मात्रा मानवी शरीसाठी अतिशय हानीकारक आहे. बदलत्या वातावरणात वाढते तापमान आणि आर्द्रतेतही वाढ झाली आहे. हवेतील वाढते धुळीचे प्रमाण याचा परिणाम येथील नागरिकांच्या शरीरावर परिणाम होत आहे. गेल्या काही वर्षांपासून उरण हे देशातील हवेतील धूलिकणाच्या कक्षेतील शहरांत नोंदविण्यात आला आहे. अनेकदा अतिशय धोकादायक असलेल्या हवेचा निर्देशांक पार पोहोचला होता. ही आकडेवारी हवेतील प्रदूषणाची उच्च पातळी व मानवी शरीरास धोकादायक



मानली जात आहे. हवेतील या वाढत्या प्रदूषणामुळे उरणमधील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. तर जागतिक आरोग्य संस्थेने दक्षता घेत येथील नागरिकांनी मुखपट्टीचा वापर करण्याची सूचना करण्यात येत आहे. यामुळे पर्यावरणवाद्यांनी त्या वेळी चिंता व्यक्त केली होती.

**हवेची गुणवत्ता पात्रता :**

हवेतील प्रदूषणाची मात्रा ही ० ते ५० चांगली, ५० ते १०० मध्यम, १०० ते १५० आजारी व श्वसन विकारासाठी हानीकारक तर १५० ते २०० ची मात्रा ही आरोग्यास प्रचंड हानीकारक मानली जाते. या मात्रेनुसार उरणच्या हवेतील प्रदूषणाची मात्रा ही माणसासाठी प्रचंड हानीकारक बनली आहे.

या हवेतील वाढत्या प्रदूषणामुळे उरणमधील ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना श्वसनाचे आजार जडू लागले आहेत. त्यामुळे सामान्य नागरिकांना मुखपट्टी (मास्क) लावण्याची सूचना करण्यात येत आहेत. पावसामुळे हवेतील धूलिकणाचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे हवेच्या प्रदूषणात घट झाली आहे. परिणामी हवा गुणवत्ता निर्देशांक पर्यावरणीय बनला आहे.

## नवी मुंबई : अंशसाठी विशेष दिवस; वाशी पोलिसांकडून स्वप्नपूर्ती

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** कधी कधी पोलीस ठाण्याचा परिसर केवळ कायदा-सुव्यवस्थेपुरता मर्यादित न राहता आशा, धैर्य आणि माणुसकीचं दर्शन घडवतो. सोमवारी, प्रजासत्ताक दिनी वाशी पोलिस ठाण्यात असाच एक क्षण अनुभवायला मिळाला. गंभीर अशा हृदयविकारासारख्या आजाराशी झुंज देणाऱ्या सात वर्षीय अंश सुधीर इंगळे या चिमुकल्यासाठी हा दिवस वेगळा आणि विशेष ठरला. पोलिसांचा गणवेश परिधान करून अधिकाऱ्यांच्या सान्निध्यात उभा असलेला अंश त्या दिवशी केवळ पाहुणा नव्हता, तर एका दिवसासाठी का होईना, वाशी पोलिस दलाचा भाग बनला होता.

'मेक-अ-विश फाउंडेशन'च्या पुढाकारातून आणि वाशी पोलिसांच्या सहकार्याने अंशचे पोलिस अधिकारी होण्याचे स्वप्न साकार करण्यात आले. पोलिसांच्या गणवेशात अंश वाशी पोलिस ठाण्यात दाखल होताच उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी



टाळ्यांच्या गजरात आणि आपुलकीने त्याचे स्वागत केले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शशिकांत चांदेकर यांनी स्वतः अंशचे स्वागत करत त्याला सन्मानाने आपल्या खुर्चीवर बसवले. हा क्षण पाहून अनेकांचे डोळे पाणावले.

यानंतर अंशला पोलिस ठाण्यातील दैनंदिन कामकाजाची माहिती देण्यात आली. नागरिकांच्या तक्रारी कशा नोंदवल्या जातात, पोलिस जनतेच्या सुरक्षिततेसाठी कसे कार्य करतात, याची प्रत्यक्ष ओळख त्याला करून देण्यात आली. शिस्तबद्ध वातावरण, जबाबदारीची जाणीव आणि सेवाभाव अनुभवताना अंशच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आनंद स्पष्टपणे जाणवत होता.

## शेतकी सोसायटीची जागा शासनजमा होणार, उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय; अंबरनाथातील २१० एकर जमीन सरकारच्या ताब्यात

**अंबरनाथ (विशाल पाटील) :** अंबरनाथ सहकारी सामुदायिक शेतकी संस्थेला सन १९६३ मध्ये शेतीसाठी विनामूल्य दिलेली तब्बल २१० एकर सरकारी जमीन अखेर शासनजमा होणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाने संस्थेचे अपील फेटाळून लावत राज्य सरकारचा जमीन पुनर्ग्रहणाचा निर्णय पूर्णतः योग्य ठरवला आहे. याच जमिनीचा बहुतांश भाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची इमारत उभारण्यासाठी वापरली जाणार आहे. त्यामुळे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचाही मार्ग मोकळा होणार आहे. नागरिककरणाच्या रेट्यात शेतकी सोसायटीत जमीन अंबरनाथमध्ये प्रतिष्ठेचे प्रतिकही मानले गेले होते.

न्या. जी. एस. कुलकर्णी आणि



न्या. आरती साठे यांच्या खंडपीठाने २८ जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या निकालात याबाबत नमूद केले. शेतीसाठी दिलेल्या सरकारी जमिनीचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर झाला असून संस्थेने अनुदानाच्या अटींचे गंभीर उल्लंघन केले आहे. शेतीसाठी दिलेली जमीन, पण वापर रिअल इस्टेटसाठी झाला असे दिसून आले. शासनाने ही जमीन सहकारी शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी दिली होती.

एक वर्षाच्या आत जमीन लागवडीखाली आणणे बंधनकारक राहील, अन्यथा शासन जमीन परत घेऊ शकेल अट अशी होती. मात्र प्रत्यक्ष पाहणीत असे आढळून आले की फक्त ७.६८ हेक्टर (सुमारे १९ एकर) भागात काही झाडांची लागवड होती. उर्वरित जमिनीवर मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर घरे व चाळी, दुकाने व शेड, फार्महाऊस, सुमारे ४०० ते ५०० अतिक्रमणे होती. तसेच शेती जवळजवळ पूर्णतः बंद होती. तपास अहवालात संस्थेने मूळ शेतकरी सभासदांना बाजूला सारून श्रीमंत आणि शेतकरी नसलेल्या सदस्यांना सामावून घेतल्याचेही उघड झाले होते.

राज्य सरकारतर्फे वरिष्ठ वकील अशुतोष कुंभकोणी यांनी प्रतिवाद करत सांगितले की जमीन केवळ शेतीसाठी दिली होती. प्रत्यक्ष पंचनाम्यात शेती नसल्याचे स्पष्ट झाले. संस्थेने अनधिकृत बांधकामे होऊ दिली. सरकारी जमिनीचा व्यापारी वापर झाला. ही जमीन शहराच्या मध्यवर्ती भागात असून सार्वजनिक उपयोगासाठी आवश्यक आहे. त्यामुळे शासनाचा जमीन परत घेण्याचा निर्णय पूर्णतः योग्य असल्याचे त्यांनी मांडले.

**न्यायालयाचे निरीक्षण**

खंडपीठाने आपल्या निकालात नमूद केले की संस्थेने अनुदानाच्या अटींचा उघड भंग केला आहे. शेतीऐवजी व्यावसायिक वापर झाला. जमिनीचे संरक्षण करण्याचे कर्तव्य संस्थेने पार पाडले नाही. अशा प्रकारच्या गैरवापराला कायदेशीर संरक्षण देता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच सर्व बेकायदेशीर अतिक्रमणांवर कारवाई करण्यास मोकळीक दिली आहे.

## जिल्ह्यात तीन ठिकाणी बिबट्याला पकडण्यासाठी बसवले पिंजरे

**पालघर (सुचिता सोनावणे) :** पश्चिम महाराष्ट्रात ज्याप्रमाणे ऊसाच्या फडामध्ये बिबट्याने कायमस्वरूपी निवास करण्याचे ठिकाणे बनविली आहेत त्या धर्तीवर पालघर जिल्ह्यात चिकू किंवा इतर वाड्यांमध्ये बिबट्याला कायमस्वरूपी निवास करण्याची व्यवस्था होऊ नये या दृष्टीने वनविभागाने आखणी केली आहे. याखेरीज बोर्डी, सफाळे व बोईसर च्या पूर्व पट्ट्यांमध्ये वन विभागाने बिबट्यासाठी पिंजरे बसविले आहेत.

पालघर व डहाणू तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्याचा वावर गेल्या सहा ते आठ महिन्यांपासून दिसून आला असून अलीकडच्या महिना दीड महिन्याच्या कालावधीत बिबट्याने बकऱ्या, वासरं व कुत्र्यांना आपले भक्ष बनवल्याचे दिसून आले आहे. सफाळा व बोर्डी परिसरात मानवी वस्ती मध्ये बिबट्याचा शिरकाव झाल्याचे नागरिकांच्या घरगुती सीसीटीव्ही तसेच वन विभागाने बसवलेल्या ट्रॅप कॅमेरामध्ये आढळून आले आहे.



बिबट्याच्या वावरामुळे रात्री कामावरून परतताना अथवा सकाळी कामानिमित्त बाहेर पडणाऱ्या कर्मचाऱ्यांमध्ये तसेच शालेय विद्यार्थी व शेतीवाडी मध्ये काम करणाऱ्या कामगारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या संदर्भात पालकमंत्री तथा वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे ही बाब उपस्थित केल्यानंतर बिबट्याचा वावर असणाऱ्या ठिकाणी पिंजरे बसविण्याच्या सूचना त्यांनी वनविभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

सद्यस्थितीत बोर्डी येथे वासरू मारलेल्या ठिकाणी बिबट्यासाठी पिंजरा बसवण्यात आला असून सफाळे पश्चिम भागात व बोईसरच्या पूर्व भागात बिबट्याच्या वावराच्या संभाव्य ठिकाणी असे पिंजरे बसवण्यात आले आहेत. काही पशूला बिबट्याने आपले भक्ष केले असले तरीही अजूनपर्यंत बिबट्याने नागरी वस्तीमध्ये हल्ला केला नसल्याची बाब समाधानाची असल्याचे डहाणूचे उपवनसंरक्षक निरंजय दिवाकर यांनी सांगितले आहे. यामुळे जिल्ह्यात तीन ठिकाणी बिबट्या पकडण्यासाठी पिंजरे रचली असले तरीही या पिंजऱ्यांमध्ये बिबट्याला आकर्षित करण्यासाठी भक्ष ठेवला नसल्याचा खुलासा त्यांनी केला आहे.

ऊसातील बिबट्याप्रमाणे वाडीतील बिबट्या पद्धती पालघर जिल्ह्यात रुजू होऊ नये अर्थात बिबट्याने चिकू किंवा अन्य घनदाट वाड्यांमध्ये कायमस्वरूपी वास्तव्य करू नये यासाठी वन विभागाने योजना केली आहे. त्याच्या आधारे बिबट्याचा संभाव्य वावर असणाऱ्या ठिकाणी फटाके फोडण्यात येत असून बिबट्याला सहजगत नागरी वस्ती व लगतच्या भागातून जंगलामध्ये परतवण्यासाठी वन विभागाचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

## घोडागाडीच्या अपघात प्रकरणात गुन्हा दाखल

**पालघर (सतीश सोनावणे) :** प्रजासत्ताक दिनी केळवा समुद्र किनाऱ्यवर एका मुलीच्या अंगावरून घोडा गाडी गेल्याच्या प्रकारात संबंधित घोडागाडी मालकाविरुद्ध केळवे सागरी पोलिसांनी हलगर्जीपणा तसेच गंभीर दुखापत पोचविल्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान पोलिसांनी समुद्रकिनारी असणारे घोडागाडी, उंट सफर, बीच बाईक यांना चालविण्यासाठी आवश्यक परवाने नसल्याने हे उपक्रम बंद ठेवण्यात आले आहेत.पालघर शहरात राहणाऱ्या जान्हवी पाटील (१२) यांच्यासह त्यांच्या इमारती मधील महिला सुट्टीचा आनंद घेण्यासाठी केळवे किनाऱ्यावर येथे २६ जानेवारी रोजी गेल्या होत्या. दुपारी साडेचार वाजल्याच्या सुमारास पर्यटकांना घोडागाडी सफर करणारा एक टांगा भरधव तिच्या दिशेने आला. बेसावध असल्याने जान्हवी हिला टांग्याने धडक घेऊन टांग्याची चाक तिच्या पोटावरून गेल्याने तिला गंभीर दुखापत झाली. ही मुलीवर वर सध्या मुंबई (अंधेरी) येथील एका नामांकित खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.दरम्यान केळवे पोलिसांनी जखमी मुलीच्या नातेवाईकांशी



तसेच सोबत असणाऱ्या महिला सहकाऱ्यांशी संपर्क करून संबंधित घोडागाडी मालका विरुद्ध काल (ता २८) हलगर्जीपणा, घोडागाडी बेदरकारपणे चालवणे तसेच तरुणीला गंभीर जखमी करण्यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या संदर्भात संबंधितांचे जबाब नोंदविण्यात येत असून आरोप पत्र दाखल करण्याच्या दृष्टीने इतर पुरावे व तपास केला जात असल्याची महिती देण्यात आली. दरम्यान किनाऱ्या वर पर्यटकांच्या करमणुकीसाठी परवाने दिले गेल्यास त्यावर देखरेख ठेवणासाठी महाराष्ट्र सागरी मंडळ, राज्य सरकारचा पर्यटन विभाग तसेच ग्रामपंचायतीकडून नियमन व देखरेख ठेवण्याची यंत्रणा नसल्याचे दिसून आले आहे. असे अपघात व दुर्घटना टाळण्यासाठी ठोस नियमावली तयार करून त्याच्या पालनासाठी यंत्रणा कार्यरत करण्याची मागणी स्थानिकांनी केली आहे.महाराष्ट्र सागरी मंडळाने समुद्रकिनाऱ्यावर पर्यटनाला वाव मिळावा या उद्देशाने बीच बाईक, सागरी नौकानयन, घोडा गाड्या, उंट सफर सारख्या प्रकारांना परवानगी दिली होती. मात्र संबंधितांनी महाराष्ट्र सागरी मंडळ तसेच राज्याच्या पर्यटन विभागा तर्फे देण्यात आलेले परवान्याचे नूतनीकरण केले नसल्याने पर्यटकांसाठी करमणकीची ही साधने बंद ठेवण्यात आली आहेत. समुद्र किनाऱ्यवर मोठ्या प्रमाणात पर्यटक असताना बेदरकारपणे व अति जलद वेगाने बाईक व टांगे पर्यटकांसाठी चालवत असल्याने अनेकदा लहान-मोठे अपघात घडले आहेत. तर पर्यटकांचा ओघ किनाऱ्याच्या उत्तरेच्या बाजूला असताना बाईक, घोडा गाडी व इतर मनोरंजनाचे प्रकार दक्षिणेच्या दिशेने चालवण्याच्या सूचनेकडे संबंधित दुर्लक्ष केले असल्याचे दिसून आले आहेत. या संदर्भात केळवे सागरी पोलीस स्टेशन ने यापूर्वी देखील नोटीस बजावली होती. या गंभीर अपघाताच्या पार्श्वभूमीवर संबंधित व्यावसायिकांना आवश्यक कागदपत्र सादर न केल्याने बीच बाईक, घोडा गाडी, उंट सफर यांना तातडीने बंद करण्यात आली आहे.

## डोंबिवली देवीचा पाड्यातील बेकायदा चाळी पालिकेकडून जमीनदोस्त

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा भागातील खारफुटी तोडून, तलाव भागात भराव टाकून उभारण्यात आलेल्या बेकायदा चाळी शुक्रवारी कल्याण डोंबिवली पालिकेच्या ह प्रभागाचे साहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांनी आयुक्त अभिनव गोयल, उपायुक्त समीर भूमकर यांच्या आदेशावरून तोडकाम पथक आणि जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट केल्या.

पालिका निवडणूक काळात गेल्या दीड महिन्याच्या कालावधीत या बेकायदा चाळी देवीचापाडा खाडी किनारा भागातील मोकळ्या जागा, खारफुटी तोडून उभारण्यात आल्याने पर्यावरणप्रेमींनी नाराजी व्यक्त केली होती. याप्रकरणी तक्रारदार कल्पेश जोशी यांनी आझाद मैदान येथे उपोषण सुरू केले होते. या बेकायदा चाळींमुळे देवीचापाडा भागातील एकमेव हरितपट्टा नष्ट होत असल्याने स्थानिक रहिवाशांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. या बेकायदा चाळी खारफुटी तोडून, खाडी किनारा भागात भराव टाकून उभारण्यात आल्याने पर्यावरण ऱ्हासाचा विचार करून 'लोकसत्ता'ने गेल्या महिन्यापासून या बेकायदा चाळींविरूध्द आवाज उठविला होता.

या बेकायदा चाळी तोडण्यासाठी सर्व स्तरातून प्रभावी मागणी होऊ लागली. भूमाफिया विविध प्रकारचे दबाव आणून ही कारवाई टाळण्यासाठी अधिकाऱ्यांवर दबाव आणत होते. त्यामुळे ही कारवाई करण्यात अधिकाऱ्यांना अडथळे येत होते. शुक्रवारी दुपारी ह प्रभागाचे राजेश



सावंत यांनी तोडकाम पथक, जेसीबी घेऊन देवीचापाडा खाडी किनारा परिसर गाठला. आणि एकापोठापाठ उभारण्यात आलेल्या बेकायदा चाळी तोडकाम पथक आणि जेसीबीच्या साहाय्याने भुईसपाट करण्यात आल्या. आपल्या चाळींवर कारवाई होणार नाही या विचारात असलेल्या भूमाफियांची या कारवाईने पळापळ झाली. चाळी उभारण्याची कामे या भागात सुरू होती. कारवाई पथक येताच या कामांवरील गवंडी, मजूर कामे टाकून पळून गेले. कारवाईच्या वेळी एकही भूमाफिया कारवाई रोखण्यासाठी पुढे आला नाही. यापूर्वी फिरण्यासाठी मोकळा असलेला परिसर मोकळा झाल्याने पर्यावरणप्रेमी नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

**कोपर भागातही हातोडा**

देवीचापाडा कारवाईप्रमाणे तोडकाम पथकाने कोपर गाव भागात खाडी किनारा बुजवून, खारफुटीची झाडे तोडून म्हाळसाई चाळीच्या बाजुला उभारलेल्या बेकायदा चाळी जमीनदोस्त करण्याची मागणी स्थानिक रहिवासी आणि पर्यावरणप्रेमी करत आहेत. तक्रारदारही या बेकायदा चाळी तोडण्यासाठी आक्रमक आहे.

> “ देवीचापाडा भागातील बेकायदा चाळी शुक्रवारी कारवाई करून जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत. या चाळी पुन्हा उभारल्या जाणार नाहीत याची काळजी घेतली जाईल. अशाच पध्दतीने कोपर भागातील चाळींवर कारवाई करण्यात येईल.
> – राजेश सावंत साहाय्यक आयुक्त, ह प्रभाग क्षेत्र.



## खारभूमी बंधारे झडपे वारंवार तोडल्याने नुकसान

रत्नागिरी तालुक्यातील गावडे आंबेरे बिरजेवाडी ते पूर्णगड यादरम्यान बांधण्यात आलेल्या खारभूमी बंधाऱ्यामुळे परिसरातील शेकडो एकर जमीन सुपीक बनलेली असताना वारंवार मच्छीमारीकरिता झडपे तोडली जात असल्यामुळे मोठ्याप्रमाणात खारे पाणी घुसत आहे. यामुळे परिसरातील अनेक जमिनी नापीक बनत चालल्या असून, पिण्याच्या पाण्याच्या विहिरींवरती मोठ्या प्रमाणात परिणाम होऊ लागला असून परिसरामध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.

# सोलो ट्रिपचं प्लॅनिंग करताय?; ही आहेत भारतातील सर्वात सुरक्षित पर्यटन स्थळे

तुम्हाला प्रवासाची आवड असेल आणि तुम्ही स्वतःला एकटेच एक्सप्लोर करू इच्छित असाल, तर स्वतःसाठी एकट्याने ट्रिप देणे हे अद्भुत असेल. एकट्याने प्रवास करणे हा केवळ एक अनोखा अनुभव नाही तर तो तुम्हाला स्वतःशी जोडण्याची आणि तुमच्या स्वतःच्या अटींवर जग एक्सप्लोर करण्याची संधी देखील देतो, तसेच भारतात अशी अनेक ठिकाणे आहे जी सुरक्षितता, आदरातिथ्य आणि सौंदर्यासाठी ओळखली जातात.



**ऋषिकेश, उत्तराखंड**

जर तुम्हाला शांतता आणि थोडा थ्रिल हवा असेल, तर ऋषिकेश बेस्ट आहे. येथे जगभरातून पर्यटक येतात, त्यामुळे वातावरण अतिशय मित्रत्वाचे आहे. गंगा आरती, रिव्हर राफ्टिंग, कॅफे हॉपिंग आणि योगा येथे करण्यासारखे आहे. येथे अनेक 'बॅकपॅकर हॉस्टेल्स' आहे जिथे सोलो ट्रॅव्हलर्सना स्वस्त आणि सुरक्षित राहता येते.

**पुदुचेरी**

दक्षिण भारतातील हे छोटेसे शहर त्याच्या शिस्तीसाठी आणि शांततेसाठी प्रसिद्ध आहे.

येथील रस्ते सायकलने फिरण्यासाठी सुरक्षित आहे आणि पर्यटकांसाठी हे उत्तम ठिकाण मानले जाते. येथे, फ्रेंच कॉलनीतील रंगीत घरे आणि सुंदर समुद्रकिनारे पाहण्यासारखे आहे.

**उदयपूर, राजस्थान**

'लेक सिटी' म्हणून ओळखले जाणारे उदयपूर त्याच्या संस्कृतीसाठी आणि सुरक्षित वातावरणासाठी ओळखले जाते. हे शहर पर्यटनावर आधारित असल्याने सुरक्षिततेला प्राधान्य दिले जाते. येथे लेक पिछोलामध्ये बोट राईड, सिटी पॅलेस आणि रात्रीच्या वेळी कुंभारवाडा बघण्यासारखा आहे.

**गोकर्ण, कर्नाटक**

गोव्याच्या गर्दीपासून दूर काहीतरी हवे असेल तर गोकर्ण हा उत्तम पर्याय आहे. येथे पर्यटकांची गर्दी कमी असते आणि वातावरण आध्यात्मिक व रिलॅक्स्ड असते.

येथील ओम बीच, हाफ मून बीचवर ट्रेकिंग आणि रिलॅक्सेशन नक्कीच भेट द्या.

**जयपूर राजस्थान**

राजस्थानची राजधानी जयपूर हे एक चैतन्यशील आणि रंगीबेरंगी शहर आहे जे त्याच्या समृद्ध संस्कृती आणि वारशासाठी ओळखले जाते. या शहरात अनेक भव्य किल्ले, राजवाडे आणि मंदिरे आहे. जयपूरमध्ये भेट देण्यासाठी काही लोकप्रिय ठिकाणांमध्ये आमेर किल्ला, हवा महल आणि सिटी पॅलेस यांचा समावेश आहे.

**शिमला**

हिमाचल प्रदेशची राजधानी शिमला हे एक लोकप्रिय हिल स्टेशन आहे जे त्याच्या नयनरम्य दृश्यांसाठी आणि आल्हाददायक हवामानासाठी ओळखले जाते. हे शहर वसाहतकालीन वास्तुकला, हिरवीगार जंगले आणि बर्फाच्छादित शिखरांनी भरलेले आहे. शिमलामध्ये भेट देण्यासाठी काही लोकप्रिय ठिकाणांमध्ये मॉल रोड, रिज आणि जाखू मंदिर यांचा समावेश आहे.

**गोवा**

भारतातील सर्वात लहान राज्य गोवा हे त्याच्या सुंदर समुद्रकिनारे, उत्साही नाईटलाइफ आणि स्वादिष्ट सीफूडसाठी ओळखले जाते. या राज्यात पोर्तुगीज काळातील अनेक चर्च आणि किल्ले देखील आहे. गोव्यात भेट देण्यासाठी काही लोकप्रिय ठिकाणांमध्ये बागा बीच, कलंगुट बीच आणि अंजुना बीच यांचा समावेश आहे.

**ऊटी**

तामिळनाडूमध्ये स्थित ऊटी हे नीलगिरी टेकड्यांमध्ये वसलेले एक सुंदर हिल स्टेशन आहे. हे शहर चहाच्या बागा, हिरवीगार जंगले आणि आल्हाददायक हवामानासाठी ओळखले जाते. ऊटीमध्ये भेट देण्यासाठी काही लोकप्रिय ठिकाणांमध्ये उटी तलाव, बोटॅनिकल गार्डन आणि दोड्डाबेट्टा शिखर यांचा समावेश आहे.

**एकट्या प्रवासाचे फायदे**

एकट्या प्रवासाचे अनेक फायदे आहे, ज्यात हे समाविष्ट आहे:

• स्वातंत्र्य: तुम्ही तुमच्या गतीने प्रवास करू शकता आणि तुम्हाला हवे ते करू शकता.

• लवचिकता: तुम्ही तुमच्या योजना सहजपणे बदलू शकता आणि नवीन ठिकाणे एक्सप्लोर करू शकता.

• स्वतःचा शोध: एकटे राहून, तुम्ही स्वतःबद्दल आणि तुमच्या ताकदी आणि कमकुवतपणाबद्दल जाणून घेऊ शकता. यावेळी, तुम्ही स्वतःसोबत वेळ घालवू शकता आणि स्वतःला चांगले समजून घेऊ शकता.

• सक्षमीकरण: तुम्ही तुमच्या क्षमतांमध्ये अधिक आत्मविश्वासू शकता.

**सोलो ट्रॅव्हलर्ससाठी काही महत्त्वाच्या टिप्स**


रात्रीचा प्रवास टाळा-शक्यतो दिवसा प्रवास करा आणि नवीन ठिकाणी अंधार पडायच्या आधी पोहोचा.

कागदपत्रे डिजिटल ठेवा-आधार कार्ड, पासपोर्ट आणि तिकीटांची सॉफ्ट कॉपी फोनमध्ये आणि ईमेलवर सेव्ह ठेवा.

स्थानिक लोकांशी संवाद साधा-हॉटेल किंवा कॅफेमधील लोकांशी बोलून सुरक्षित आणि असुरक्षित भागांची माहिती घ्या.

लोकेशन शेअरिंग-तुमच्या घरातील कोणाशी तरी तुमचे लाइव्ह लोकेशन नेहमी शेअर करून ठेवा.

# हिवाळ्यात सूर्यनमस्कार करण्याचे आरोग्यदायी फायदे जाणून घ्या



सूर्यनमस्काराचे अनेक फायदे आहेत, परंतु हिवाळ्यात सूर्यनमस्कार करणे शरीरासाठी रामबाण उपायापेक्षा कमी नाही, जे केवळ थंडीपासून संरक्षण करत नाही तर लठ्ठपणा, आळस कमी करते आणि आरोग्य सुधारते.

हिवाळ्यातील हवामान शरीराला आळशी बनवते. थंडीमुळे स्नायू आकुंचन पावतात, पचनक्रिया मंदावते आणि आळस येतो. या काळात सूर्यनमस्कार करणे फायदेशीर ठरू शकते. सूर्यनमस्कार ही केवळ योगासने नाही तर शरीराला आतून जागृत करणारी एक प्राचीन पद्धत आहे. भारताच्या योग परंपरेत, सूर्यनमस्कार हा ऊर्जा, उबदारपणा आणि चैतन्य यांचा स्रोत मानला जातो. थंडीच्या काळात नियमित सराव केल्याने शरीर उबदार राहते आणि आजारांविरुद्धची लढाई मजबूत होते.

हिवाळ्यात सूर्यनमस्कार केल्याने सर्दीशी संबंधित समस्यांपासून संरक्षण होते. त्यामुळे शरीराला हवामानाशी जुळवून घेण्यास मदत होते. जरी तुम्ही दररोज १०-१२ सूर्यनमस्कार केले तरी थंडीचे परिणाम आपोआप कमी होतात. या लेखात, सूर्यनमस्काराचे मुख्य फायदे जाणून घेऊ या.

**हिवाळ्यात सूर्यनमस्कार करण्याचे मोठे फायदे**

१२ आसनांचा हा संच शरीराला नैसर्गिक उष्णता प्रदान करतो. सूर्यनमस्कार शरीराचे तापमान संतुलित करण्यास मदत करतो आणि थंडीचा परिणाम कमी करतो.सूर्यनमस्कारामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते. नियमित सराव केल्याने सर्दी, खोकला आणि विषाणूजन्य संसर्ग टाळण्यास मदत होते.

चयापचय गतिमान करते. हिवाळ्यात मंद पचन सक्रिय करते, वजन वाढण्यास प्रतिबंध करते.

हे सांधे आणि स्नायूंची लवचिकता सुधारण्यास मदत करते आणि थंडीत कडकपणा आणि वेदना कमी करते.

पाठ आणि कंबरदुखी कमी करते. पाठीचा कणा मजबूत करते आणि रक्ताभिसरण सुधारते.

हे आसन मानसिक आळस दूर करते. सकाळी सूर्यनमस्कार केल्याने दिवसभर ऊर्जा टिकून राहण्यास मदत होते.

हार्मोन्स संतुलित करण्यास मदत करते. थायरॉईड आणि इतर ग्रंथींचे कार्य सुधारते.

या आसनामुळे त्वचेवर नैसर्गिक चमक येते. रक्तप्रवाह वाढल्याने कोरडेपणा कमी होतो.

नियमित सराव केल्याने फुफ्फुसांची क्षमता वाढते. प्राणायामासोबत सराव केल्याने श्वसनाच्या समस्या कमी होतात.

सूर्यनमस्कारामुळे झोप आणि मानसिक शांती सुधारते, ताण कमी होतो आणि गाढ झोप येते.

# हिवाळ्यात हीटर चालवताना कधीही या चुका करू नका

हिवाळ्यात घर हीटर वापरताना टाळायच्या चुका: संपूर्ण भारतात हिवाळा सुरू झाला आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी हीटर वापरणे सामान्य आहे. तथापि, त्यांचा योग्य वापर कसा करायचा हे फार कमी लोकांना माहिती आहे. या लेखात, हीटर वापरताना होणाऱ्या सामान्य चुकांबद्दल आणि त्यांचा सुरक्षितपणे वापर कसा करायचा याबद्दल जाणून घेऊया.




**बंद खोलीत वेंटिलेशनशिवाय हीटर चालवणे:**

थंड हवामानात, बरेच लोक खोली पूर्णपणे बंद करून हीटर चालू करतात. हे अत्यंत धोकादायक असू शकते कारण ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे गुदमरण्याचा धोका वाढतो.

**हीटरजवळ ज्वलनशील वस्तू ठेवणे:**

हीटरजवळ रजाई, पडदे किंवा लाकडी वस्तू साठवल्याने आग लागू शकते. हे आगीचे एक प्रमुख कारण असू शकते.

**रात्रभर हीटर चालू ठेवणे:**

थंडीपासून वाचण्यासाठी बरेच लोक रात्रभर हीटर चालू ठेवतात. यामुळे केवळ इलेक्ट्रिकल शॉर्ट सर्किटचा धोका वाढतोच, शिवाय खोलीतील हवाही कोरडी होते, ज्यामुळे श्वास घेण्यास त्रास होऊ शकतो.

**हीटर सुरक्षितपणे आणि योग्यरित्या कसा वापरावा ?**

वायुवीजन विचारात घ्या: हीटर वापरताना, खोलीत चांगली हवा खेळती असल्याची खात्री करा जेणेकरून ताजी हवा फिरेल.

कार्बन मोनोऑक्साइड डिटेक्टर वापरा: जर गॅस हीटर वापरत असाल तर कार्बन मोनोऑक्साइड डिटेक्टर बसवा. हे विषारी वायूपासून संरक्षण करण्यास मदत करते.

जास्त वापर टाळा: हीटरचा जास्त वापर टाळा आणि वेळोवेळी तो बंद करा जेणेकरून खोलीतील हवा स्वच्छ राहील.

**ह्युमिडिफायर वापरा:**

हीटर चालवल्याने खोलीतील आर्द्रता कमी होते. त्वचा आणि श्वसनाच्या समस्या टाळण्यासाठी ह्युमिडिफायर वापरा.

**पाण्याची एक वाटी ठेवा:**

खोलीत पाण्याचा एक वाटी ठेवल्याने हवेतील आर्द्रता टिकून राहते आणि कोरडेपणा टाळता येतो.

हिवाळ्यात अपघात टाळण्यासाठी हीटरचा योग्य वापर करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीटर वापरताना, वायुवीजनाकडे लक्ष द्या आणि सुरक्षिततेच्या खबरदारीचे पालन करा. माहिती देऊन आणि योग्य खबरदारी घेऊन, तुम्ही स्वतःची आणि तुमच्या कुटुंबाची सुरक्षितता सुनिश्चित करू शकता.

# इंडिया फाउंडेशनचे संस्थापक सीए शौर्य डोवल म्हणाले, "भारताशिवाय जागतिक शांतता आणि जागतिक व्यवस्था अस्तित्वात असू शकणार नाही"

■ डोवल यांनी बॉम्बे चार्टर्ड अकाउंटंट्स सोसायटीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या इव्हेण्टमध्ये चार्टर्ड अकाउंटंट्स समुदायाला मार्गदर्शन केले.

■ या इव्हेण्टमध्ये 'प्राचीन मुळे, जागतिक मार्ग: भारतीय सीएसाठी जागतिक नेतृत्वाची नवकल्पना' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.




बॉम्बे चार्टर्ड अकाउंटंट्स सोसायटी (बीसीएएस) द्वारे आयोजित करण्यात आलेल्या इव्हेण्टमध्ये आपले मत व्यक्त करत श्री. सीए शौर्य डोवल म्हणाले केले की, गेल्या दशकात जागतिक महासत्ता म्हणून भारताचा वाढता प्रभाव आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर अधिकाधिक स्पष्टपणे दिसून येत आहे. युनायटेड नेशन्स सिक्युरिटी कौन्सिलमध्ये कायमस्वरूपी जागा मिळवण्यासाठी भारताचा सातत्यपूर्ण पाठपुरावा असो किंवा जागतिक व्यासपीठांवरील भारताची स्वतंत्र आणि ठाम भूमिका असो, आज भारताला प्रमुख भू-राजकीय देश मानले जात आहे. त्यांनी विशेष उल्लेख केला की, दक्षिण आशिया, आफ्रिका, पश्चिम आशिया आणि आता वाढत्या प्रमाणात युरोपमध्ये देखील भारताचा प्रभाव दिसून येत आहे. ते पुढे म्हणाले की, भारत मोठी आर्थिक महासत्ता म्हणून देखील उदयास येत आहे, ज्यासह सध्या भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे.

डोवल पुढे म्हणाले की, भारताची मोठी क्षमता आता वेगळ्या प्रकारची बुद्धिमत्ता क्षमता निर्माण करण्यावरून ओळखली जाईल. ते म्हणाले की, भारताने जगाला प्रतिभावान व्यक्ती दिल्या आहेत, पण आता भविष्य भारतीय बुद्धिमत्ता देण्यावर अवलंबून असेल. योग आणि आयुर्वेदाला मिळालेली जागतिक मान्यता यामधून भारताच्या बौद्धिक परंपरेला जगभरात स्वीकृती मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. भारत जसजसा आपले विचार अधिक स्पष्टपणे मांडेल आणि आपला संदेश प्रभावीपणे पोहोचवेल, तसतसे जगाला भारताच्या बौद्धिक योगदानाचा फायदा होईल आणि भारताची विश्वगुरू म्हणून ओळख प्रस्थापित होईल. तंत्रज्ञान, आर्थिक विस्तार आणि बौद्धिक क्षमतेतील प्रगतीमुळे भारताच्या वाढत्या क्षमतेला आधीच जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे. आपल्या व्यावसायिक आणि ज्ञानाचा वापर करत भारत वर्चस्व गाजवण्यापेक्षा जबाबदारीने जागतिक व्यवस्थांना आकार देऊ शकतो.

या सत्रामध्ये चार्टर्ड अकाउंटंट्सनी झपाट्याने बदलत असलेल्या आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि फायनान्शियल क्षेत्रात आपल्या मूळ तत्त्वांशी बांधील राहून वाटचाल करावी यावर विशेष भर देण्यात आला. या चर्चेमध्ये जागतिक अर्थव्यवस्थेत भावी प्रमुख घडवण्यासाठी नैतिक नेतृत्व आणि मूल्यांवर आधारित निर्णय घेण्याची क्षमता हे पायाभूत घटक असल्याचे निदर्शनास आले.

आपल्या उद्घाटनीय भाषणामध्ये बीसीएएसचे अध्यक्ष सीए झुबिन बिलीमोरिया म्हणाले, ''यासारखी सत्रे आपल्या समुदायासाठी शिक्षण, संवाद आणि सामूहिक विचारांचे महत्त्वाचे व्यासपीठ निर्माण करतात. विविध दृष्टिकोन आणि अनुभवी प्रमुखांना एकत्र आणून ही सत्रे चार्टर्ड अकाउंटंट्सना जागतिक अर्थव्यवस्थेतील नेतृत्वाच्या बदलत्या गरजांवर विचार करण्यास, त्याबाबत जाणून घेण्यास आणि स्वतःला सुसज्ज करण्यास सक्षम करतात. अशा प्रकारचे उपक्रम आपल्या व्यावसायिक समुदायाला आणि विचारांच्या व्यापक देवाणघेवाणीला अधिक प्रबळ करतात.''

बीसीएएसने उपस्थितांना अद्वितीय संधी दिली आहे, जेथे ज्योत फाऊंडेशन एक्झिबिशनचा मार्गदर्शित टूर 'वसुधैव कुटुंबकम की ओर ४: जगाला नवी दिशा देणारी १२ तत्त्वे' उपस्थितांना जागतिक नेतृत्वाबाबत अधिक सांस्कृतिक व तात्विक ज्ञान देण्यासाठी डिझाइन करण्यात आला होता.



## बोर्ड परीक्षा की निवडणूक काम; शिक्षकांपुढे पेच

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी- बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षा अन जिल्हा परिषद पंचायत समितीचे कर्तव्य एकाच वेळी आल्याने शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांमध्ये मोठा पेच निर्माण झाला आहे. दोन्ही कर्तव्य अत्यावश्यक सेवेत येत असल्याने नेमके प्राधान्य कशाला द्यावे, या विवंचनेत शिक्षक अडकले आहेत. कामाचा ताण वाढल्याने शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मानसिक स्वास्थ्य हरवू लागले आहे.



# स्वच्छंद मनाच्या लहरी !

माणसाचं खरं आकाश त्याच्या मनात असतं. त्याचा अवकाश तर डोळ्यांना दिसणाऱ्या भौतिक आकाशाहून केवढा तरी मोठा! पसारा केवढा तरी मोठा! त्यात भूतकाळ सामावलेला आहे आणि भविष्याला सामावून घेण्याची क्षमता आहे. सूक्ष्मातल्या सूक्ष्म गोष्टीपासून अजस्त्र गोष्टी मन पाहू शकतं. ब्रम्हांड सामावून घेतं ते. तेच आकाश खरं मोकळं हवं. मनावर ओझं असलं की ते आपला अवकाश कमी कमी करत जातं. आज दैनंदिन जीवनातील अडचणींना तोंड देताना मेटाकुटीला आलेला माणूस प्रचंड दडपणाखाली आहे. राजकारण त्यात अधिक भर घालत आहे. आपण राजकीय पक्षांना न अनुसरता पक्ष्यांना अनुसरूया आणि २०२६ या वर्षांत मोकळया आकाशात स्वच्छंद, स्वतंत्र आणि स्वैर विहार करूया. मोकळा विचार करूया.

फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश हे गीत सुंदर आहेच. प्रश्नच नाही. पण मोकळे आकाश म्हणजे काय? फक्त प्रकाश? घुबडांखेरीज इतर पक्षांसाठी प्रकाश फारच महत्त्वाचा. रात्री पक्षी पाहू शकत नाही. माणूस रात्रीचं आकाश पाहू शकतो. एखाद्या रात्री चंद्रही नसतो आकाशात पण आकाश ढगाळ नसलं की निळ्या आकाशात असंख्य चांदण्या दिसतात. एखाद्या मैदानात झोपून त्या आकाशाकडे पाहिलं तर त्या तारका आणि मध्येच पडणारी एखादी उल्का दिसते. ते आकाश मोकळं म्हणायचं का! असं मोकळं आकाश आता शहरवासीयांना कुठलं दिसायला! उंच उंच इमारतींनी आकाशाचा अवकाश माणसासाठी कमी केलाय. दिवसा लोकलमधून प्रवास करताना डोळ्यांसमोर दुसऱ्या माणसाची पाठ असते आणि रात्री घराच्या खिडकीतून आजूबाजूच्या उंच इमारती दिसतात. मोकळं आकाश कुठे शोधायचं?

मोकळ्या आकाशात स्वैर संचार करणारे पक्षीही कुठे गायब झाले कुणास ठाऊक? गरूड तर प्रथम फक्त पुस्तकात, नंतर झूमध्ये आणि सिनेमातच दिसला. घारी मात्र खूप दिसत. घारीचा डौलदार संचार खूप छान वाटायचा पहायला. संथ गतीने उडणं, मध्येच झेप घेणं. मुक्त संचार असायचा तिचा. आता घार दिसत नाही. चिमण्यासुध्दा गेल्या. कावळे मात्र टिकून राहिलेत. ते काव काव करत फिरत असले तरी त्यांचे लक्ष सगळं लभ्यांशावर असतं. लभ्यांशावर नजर ठेवणाऱ्या कावळ्यांचीच आजकाल चलती आहे. एका संस्कृत श्लोकात म्हटले आहे की कावळा जरी उंचावर, देवळाच्या कळसावर, जाऊन बसला तरी त्याला गरूडाची सर येत नाही. आता वेगवेगळ्या कारणांनी लावलेल्या ताराच सर्वत्र दिसतात. हिरवेगार फळाफुलांनी लगडलेले वृक्ष नाहीत. साहजिकच त्यावरील फळे खायला येणारे, फुलांतील मध शोषून घ्यायला येणारे पोपट नाहीत. कबुतरे मात्र खूप आहेत. कबुतरांचा उपयोग कधी काळी माणूस पत्र पाठवायला करायचा म्हणे! कबुतरं आता शहरात तरी आकाशात उडताना फारशी दिसत नाहीत. मोकळे आकाश विसरली आहेत ती. कबुतरांवरून वाद मात्र होत आहेत. कबुतर आपला परिसर स्वच्छ ठेवत नाहीत. माणसाने करून दिलेल्या घरात संसार थाटतात ती.

कदाचित पक्षी मोकळ्या आकाशात उडताना पाहून माणसाला हेवा वाटला असावा. अगदी अलीकडे फक्त ११५ वर्षापूर्वी विमान आकाशात उडालं. माणूस प्रवासी विमानात बसायला सुरूवात व्हायला आणखी वीस-पंचवीस वर्षे गेली. दुसऱ्या महायुद्धानंतर प्रवासी विमानांची संख्या हळूहळू वाढायला लागली. बारा प्रवासी, सोळा प्रवासी घेऊन जाणारी विमानं सुरू झाली. भारतातील शहरी भागाला रोज एखादं विमान आकाशात दिसू लागलं. मुलं विमान पहात धावू लागली. आज कोणत्याही क्षणी जगभराच्या आकाशात पंधरा ते अठरा हजार विमानं उडत असतात आणि त्यातील काही विमानं वीस तर काही पाचशे प्रवासी घेऊन जातात. शहरात तरी विमान पहाण्याची अपूर्वाई राहिली नाही. तरीही एकदाही विमान प्रवास न केलेले लोक भारतात खूप आहेत. खरं तर आजही माणसाचं विमानातलं फिरणं पक्ष्यांच्या आकाशातल्या फिरण्यासारखं नाही. पक्षी स्वैर, स्वच्छंद, स्वतंत्र फिरतो. माणसाला खुर्चीत एका जागी बसून फिरावं लागतं. त्याच्या हालचालींवरही बंधनं असतात. अगदी पायलटलासुध्दा बंधनं, नियम पाळावे लागतात. क्वचित अपघात होतात. संख्येने असे अपघात कमी असतात, पण आघात मोठा करतात. माणसाचा कस पाहतात. माणूस अंतराळातही पोहोचलाय. चंद्रावरही पोहोचलाय. जिथे गुरूत्वाकर्षण नाही. अशा ठिकाणी मोकळ्या अवकाशात त्याने पावलं टाकलीत. हिमतीला दाद तर द्यायला पाहिजे, पण हे सर्व एका नियमबद्धतेत करावं लागतं. मोकळ्या आकाशात फिरण्याची खरी मौज तो नाहीच घेऊ शकत. पॅरासेलींग, पॅराग्लायडींग थोडी झलक चाखवतात.

हे झालं भौतिक आकाशाचं! माणसाचं खरं आकाश तर मनात असतं. त्याचा अवकाश तर डोळ्यांना दिसणाऱ्या भौतिक आकाशाहून केवढा तरी मोठा! पसारा केवढा तरी मोठा! त्यात भूतकाळ सामावलेला आहे आणि भविष्याला सामावून घेण्याची क्षमता आहे. सूक्ष्मातल्या सूक्ष्म गोष्टीपासून अजस्त्र गोष्टी मन पाहू शकतं. ब्रम्हांड सामावून घेतं ते. तेच आकाश खरं मोकळं हवं. मनावर ओझं असलं की ते आपला अवकाश कमी कमी करत जातं. आज दैनंदिन जीवनातील अडचणींना तोंड देताना मेटाकुटीला आलेला माणूस प्रचंड दडपणाखाली आहे. मोकळा श्वास घेऊ शकत नाही, स्वस्थपणे घास घेऊ शकत नाही, निवांत झोप घेऊ शकत नाही, त्याच्या मनातलं आकाश आक्रसलेलं छोटं रहाणार. मग ते मन कुठे झेपावणार? वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हीजन, त्यावरील बातम्या आणि समाजमाध्यमे त्याच्या त्या संकुचित मनाचा ताबा घेतात. त्याच्या मनात आपल्याला हवं ते पेरायचा प्रयत्न करतात. ५यात जाहिरातींचा भाग मोठा असतो. जाहिराती पाहणाऱ्याचं जग ब्रँडेड होत जातं. कुठले कपडे घालावे, काय खावं, काय प्यावं, कुठली पेस्ट वापरावी, कुठली कार घ्यावी, असं करत करत अगदी झोपायला ब्रँडेड पलंग आणि ब्रँडेड गादी घ्यावी लागते. हे सर्व कळत नकळत होतं. आपल्या देशात तरी राजकारणाचा व्याप आणि ताप खूप आहे. त्याने व्यापलेलं आकाश मोठं आहे. माध्यमांवर रोज कोणा ना कोणाच्या नावाने शिमगा होतो. कधी विरोधी पक्ष म्हणतात की, समाजमाध्यमे सरकारच्या दबावाखाली काम करताहेत तर कधी सरकारी पक्षाचा प्रतिनिधी म्हणतो की सरकारने केलेल्या चांगल्या कामाबद्दल माध्यमे काही बोलत नाहीत, पण विरोधी पक्षांच्या विधानांना प्रसिध्दी देतात. हा शिमगा सर्व माध्यमांवर चालतो. व्हॉट्सअॅप, फेसबुक, ट्विटर, इत्यादी माध्यमावर वरचेवर एकमेकांविरुद्ध पोस्ट्स फिरवण्याचा कार्यक्रम चालू असतो.

बातमी खरी असो वा खोटी, ती असते दोन ओळींची पण मसाला असतो दहा ओळींचा. माध्यमांवर त्याविषयी लेख लिहिले जातात आणि शेकड्यांनी कमेंट्स केल्या जातात. एखाद्याच्या कमेंट्स व्हायरल होतात. पूर्वी व्हायरल हा शब्द डॉक्टरांकडून ऐकायला मिळायचा. त्यावरून एवढाच बोध व्हायचा की आता काही महाग इंजेक्शने घ्यायला लागणार. जेव्हा कमेंट्स व्हायरल होतात, तेव्हा वाटते राजकारणाला कुठली अँन्टीबायोटीक्स द्यायला लागणार आहेत कुणास ठाऊक. कमेंट्स करून काही कमेंट्स वाचून तुमच्या शब्दसंपत्तीत किंवा अप-शब्दसंपत्तीत म्हणा नक्कीच भर पडते. त्यात जवळजवळ दोन तट पडले आहेत. खरे तर बरेच गट आहेत, पण सरकार-समर्थक व सरकार-विरोधी असे दोन गट स्पष्ट आहेत. तटस्थ लोकांना तिथे वाव नाही. काही हुशार लोक तर परदेशात राहून इथले सरकार सुधारावं म्हणून खूप छान लिहून इथल्या सरकारविरोधी गोटाला आनंदीत करतात. तर इथले सरकार समर्थक आपल्या खंबीर वाणी वा लेखणीचा टेकू देऊन सरकार-समर्थक गोटाला आनंदीत करतात. परिणामी आधीच जात-पात, प्रांत आणि धर्म यात विभागलेला समाज आता सरकारी व अ-सरकारी अशी आणखी एक कायम विभागणी सोसतोय.

आपण राजकीय पक्षांना न अनुसरता पक्ष्यांना अनुसरूया आणि २०२६ या वर्षांत मोकळ्या आकाशात स्वच्छंद, स्वतंत्र आणि स्वैर विहार करूया. मोकळा विचार करूया. काही पक्षीही कळपाने फिरतात, पण आपण आकाशात एकट्या फिरणाऱ्या गरूड, घार आदी पक्ष्यांप्रमाणे मुक्त संचार करूया.

## काश्मिरी पुलाव

खाना-खजाना



**साहित्य :**
बासमती तांदूळ-१ कप,तूप -२ मोठे चमचे,दूध- १/४ कप (केशर भिजवलेले),केशर-१०-१२ काड्या,सुका मेवा काजू, बदाम, अक्रोड, बेदाणे,ताजी फळे- डाळिंबाचे दाणे, सफरचंदाचे काप,खडा मसाला- तमालपत्र, दालचिनी, लवंग, हिरवी वेलची, शहाजिरे,कांदा-१ मोठा लांब चिरलेला आणि कुरकुरीत तळलेला,आले-लसूण पेस्ट-१ छोटा चमचा,साखर किंवा मध-१ छोटा चमचा ,मीठ चवीनुसार.

**कृती :**
सर्वात आधी बासमती तांदूळ स्वच्छ धुवून २० मिनिटे भिजत ठेवा. त्यानंतर पाणी उपसून घ्या. आता कोमट दुधात केशर भिजत ठेवा, जेणेकरून पुलावला छान पिवळसर रंग आणि सुगंध येईल. आता कुकरमध्ये किंवा कढईत तूप गरम करा. त्यात काजू, बदाम आणि बेदाणे हलके सोनेरी होईपर्यंत तळून बाजूला काढून ठेवा.उरलेल्या तुपात शहाजिरे, तमालपत्र, दालचिनी, लवंग आणि वेलची टाका. मसाल्यांचा सुगंध सुटला की त्यात आले-लसूण पेस्ट घालून परता. आता भिजवलेला तांदूळ घालून २-३ मिनिटे हलक्या हाताने परता, जेणेकरून तांदूळ तुपात छान कोट होईल.तांदळाच्या दुप्पट पाणी आणि केशरचे दूध त्यात ओता. चवीनुसार मीठ आणि १ चमचा साखर घाला. कुकरला मध्यम आचेवर २ शिट्ट्या करून घ्या. तांदूळ जास्त शिजून लगदा होणार नाही याची काळजी घ्या. पुलाव तयार झाला की तो एका मोठ्या भांड्यात काढून घ्या. त्यावर तळलेला कुरकुरीत कांदा, तळलेला सुका मेवा, डाळिंबाचे दाणे आणि सफरचंदाचे तुकडे घालून हलक्या हाताने मिक्स करा.

**खास टिप्स :**
सफरचंद किंवा डाळिंब नेहमी पुलाव सर्व्ह करण्यापूर्वीच टाका, अन्यथा फळे गरम वाफेमुळे मऊ पडतात.काश्मिरी पुलावला अधिक रिच टेस्ट हवी असेल, तर पाणी आणि दूध ५०:५० प्रमाणात वापरू शकता.कांदा कुरकुरीत तळण्यासाठी त्यात चिमूटभर साखर घालून तळा, यामुळे रंग छान येतो.

# पायलट होण्यासाठी तुम्हाला कोणत्या परीक्षा द्याव्या लागतात



पायलट होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी, योग्य परीक्षा, परवाना प्रक्रिया आणि प्रशिक्षण जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यानंतर, तुम्ही तुमचे करिअर नवीन उंचीवर नेऊ शकता.

विमान वाहतूक क्षेत्रात वाढत्या संधींसह, पायलटिंग हे आजकाल सर्वात जास्त पगाराच्या करिअर पर्यायांपैकी एक बनत आहे. जर तुम्ही विज्ञान शाखेत बारावी उत्तीर्ण केले असेल, तर तुम्ही या प्रतिष्ठित पदाकडे तुमचा प्रवास सुरू करू शकता.

जर तुम्ही पायलट होण्याचे स्वप्न पाहत असाल तर योग्य माहिती मिळवणे, परीक्षा देणे आणि प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.

यानंतर, तुम्ही उज्ज्वल भविष्याची कल्पना करू शकता.

**बारावीमध्ये हे विषय आवश्यक आहेत**

पायलट होण्यासाठी प्राथमिक अट म्हणजे विज्ञान शाखेसह बारावी उत्तीर्ण असणे. दोन्ही मुख्य विषयांमध्ये किमान ५०% गुण असणे आवश्यक आहे. जर एखाद्या विद्यार्थ्याने बारावीत गणिताचा अभ्यास केला नसेल, तर ते खुल्या बोर्डाची परीक्षा देऊन पुन्हा पात्रता मिळवू शकतात.

**डीजीसीए वैद्यकीय चाचणी**

पायलट होण्यासाठी शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्ती अत्यंत महत्त्वाची आहे. हे साध्य करण्यासाठी डीजीसीए दोन स्तरांच्या वैद्यकीय चाचण्या घेते.

वर्ग-२ वैद्यकीय: ही प्रारंभिक तपासणी आहे ज्यामध्ये दृष्टी, रक्तदाब, श्रवण क्षमता आणि मानसिक आरोग्याची तपासणी समाविष्ट असते.

क्लास १ मेडिकल: कमर्शियल पायलट लायसन्स (CPL) मिळविण्यासाठी ही शेवटची आणि सर्वात कठोर परीक्षा आहे. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यास तुम्ही व्यावसायिक उड्डाणासाठी पात्र ठरता.

**प्रशिक्षण कसे सुरू होईल?**

पायलट प्रशिक्षण महागडे असते. भारतातील किंवा परदेशातील फ्लाइंग स्कूलमधून सीपीएल (कमर्शियल पायलट लायसन्स) मिळविण्याचा एकूण खर्च ₹३५ लाख ते ₹१ कोटी पर्यंत असू शकतो. यामध्ये ग्राउंड क्लासेस, सिम्युलेटर प्रशिक्षण आणि सुमारे २०० तासांचे प्रत्यक्ष उड्डाण समाविष्ट आहे. तुम्ही थेट फ्लाइंग स्कूलमध्ये सामील होऊ शकता किंवा प्रथम डीजीसीए लेखी परीक्षा उत्तीर्ण होऊ शकता आणि नंतर उड्डाण प्रशिक्षण सुरू करू शकता.

**निवड प्रक्रिया आणि पगार**

विमान कंपनीत पायलट म्हणून सामील होण्यासाठी मुलाखत पुरेशी नाही. उमेदवारांना लेखी परीक्षा, हात-डोळा समन्वय चाचणी (पायलट अॅप्टिट्यूड टेस्ट) आणि सायकोमेट्रिक चाचणी देखील उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

प्रथम अधिकाऱ्यांना साधारणपणे दरमहा ₹३ लाखांचा प्रारंभिक पगार मिळतो, तर कॅप्टनना साधारणतः ₹८ लाख ते ₹१० लाखांचा पगार मिळतो. अनुभवी वरिष्ठ कॅप्टन ₹१५ लाखांपर्यंत कमवू शकतात.

दैनिक लोकरक्षणाय
सर्व सर्जनशील वाचकांसाठी संधी

ARTICLE
माहितीयुक्त, जागरूकता पसरवणारे, कायद्याचे ज्ञान देणारे स्वलिखित लेख

POEM
भावनात्मक, जागरूकता पसरवणारे, ज्ञान-बोध देणारी स्वलिखित कविता

RECIPE
पौष्टिक आणि सत्त्वयुक्त, स्वादिष्ट, आगळ्या-वेगळ्या पाककला रेसिपी

SUCCESS STORIES
सामान्यातून असामान्य, वीरता, यश, प्रेरणात्मक, बोध कथा

Information
महाराष्ट्रातील विविध पर्यटन स्थळांची, समृद्ध सांस्कृतिक वारशाची माहिती

ध्यास
समुदायातील सकारात्मक आवाजांना बळकटी देण्यासाठी एक व्यासपीठ
ध्यास सकारात्मकतेचा

## उपमुख्यमंत्रिपदासाठी खा. सुनेत्रा पवार यांचे नाव चर्चेत

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पश्चात उपमुख्यमंत्रिपद कोणाकडे जाणार? असा प्रश्न चर्चेत आला असून, उपमुख्यमंत्रिपदासाठी अजित पवार यांच्या पत्नी खासदार सुनेत्रा पवार यांच्या नावासाठी राष्ट्रवादीचे आमदार आग्रही आहेत. सद्यस्थितीत भाजपचे नेतृत्वदेखील उपमुख्यमंत्रिपद खासदार सुनेत्रा पवार यांच्याकडे देण्यास राजी असल्याचे कळते.अजित पवारांच्या अकाली निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याशिवाय पर्याय नाही, असा जो तर्क मांडला होता तो तूर्त बाजूला पडण्याची चिन्हे आहेत.

# महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या निधनानंतर मराठी सिनेसृष्टीत निर्माण झालं वादळ

## 'पुन्हा एकदा साडे माडे तीन'ची रिलीज डेट पुढं ढकलली गेली

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं २८ जानेवारी २०२६ रोजी निधन झाले. विमान अपघातात निधन झाल्यानंतर महाराष्ट्रात शोककला पसरली आहे. आता त्यांच्यावर गुरुवारी बारामतीमधील विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कार दरम्यान 'एकच वादा अजित दादा' अशा घोषणा देत नेते, कार्यकर्ते, सर्वसामान्य माणूस भावुक झाल्याचे यावेळी दिसले. 'महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री' अजित पवार यांच्या अचानक जाण्यानं संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. आता अजित पवार यांच्या निधनानंतर मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक स्टार्सनं त्यांना श्रद्धांजली वाहिली आहेत. आता मराठी चित्रपट 'पुन्हा एकदा साडे माडे तीन'बद्दल एक माहिती समोर आली आहे.

**'पुन्हा एकदा साडे माडे तीन'ची रिलीज बदलविण्यात आली :** 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' या चित्रपटाच्या निर्मात्यांनी एक सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी अजित पवार यांच्या निधनामुळं चित्रपटाची रिलीज डेट पुढं ढकलत येत असल्याचं सांगितलं आहे. अंकुश चौधरी दिग्दर्शित 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' हा चित्रपट खूप दिवसांपासून चर्चेत आहे. या चित्रपटाला पाहण्यासाठी अनेकजण आतुर आहेत. या चित्रपटामध्ये अशोक सराफ, भरत जाधव, मकरंद अनासपुरे, सिद्धार्थ जाधव, रिंकू






राजगुरू, संजय नार्वेकर, संकेत पाठक आणि समृद्धी केळकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. 'पुन्हा एकदा साडे माडे तीन'चे निर्माते पुष्कर यावलकर, स्वाती खोपकर, उषा काकडे, सुधीर कोलते आणि निनाद नंदकुमार बत्तीन हे आहेत.

**'पुन्हा एकदा साडे माडे तीन'च्या टीमनं शेअर केली माहिती :** दरम्यान 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' चित्रपटाच्या टीमनं शेअर केलेल्या पोस्टमध्ये असे लिहिलं आहे की, 'महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री, माननीय अजितदादा पवार यांच्या अकाली जाण्यानं संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. हा धक्का अत्यंत वेदनादायी असून प्रत्येक मराठी मन आज हळहळत आहे. या दुःखद प्रसंगी आम्हीही या शोकभावनेत सहभागी आहोत. त्यामुळेच संवेदनशीलतेची जाणीव ठेवत, आमच्या 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' या आगामी चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे.' या कठीण क्षणी माननीय अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत, त्यांच्या कुटुंबीयांप्रती आणि समस्त महाराष्ट्राप्रती आम्ही मनापासून संवेदना व्यक्त करतो. टीम 'पुन्हा एकदा साडे माडे ३.' आता हा चित्रपट कधी रिलीज होणार, हे अद्याप जाहीर झालेले नाही. याशिवाय दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित 'रणपति शिवराज स्वारी आग्रा'ची देखील रिलीज तारीख पुढं ढकलण्यात आली आहे. हा चित्रपट आता ६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. दरम्यान 'रणपति शिवराज स्वारी आग्रा' आणि 'पुन्हा एकदा साडे माडे तीन' या दोन्ही चित्रपटांमध्ये ३० जानेवारी २०२६ या एकाच रिलीज डेटवरुन वाद निर्माण झाला होता. आता दोन्ही चित्रपटांची रिलीज तारीख बदलविण्यात आली आहे.

## 'बॉर्डर २'च्या यशानंतर सनी देओलनं व्हिडिओ शेअर करून मानले चाहत्यांचे आभार






बॉलिवूड अभिनेता सनी देओलच्या 'बॉर्डर २'नं २९ जानेवारी रोजी बॉक्स ऑफिसवर प्रदर्शित होऊन एक आठवडा पूर्ण केला आहे. २३ जानेवारी रोजी थिएटरमध्ये दाखल झालेला या चित्रपटानं पहिल्या दिवशी बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई केली. पहिल्या दिवशीच चित्रपट हिट ठरला आहे. सकारात्मक प्रतिसादामुळं, चित्रपट फक्त सहा दिवसांत २५० कोटींच्या जवळ पोहोचला आहे. चित्रपटाला इतके प्रेम मिळत असल्याचं पाहून, सनी देओलनं प्रेक्षकांचे आभार मानले आहे. त्यानं गुरुवारी,त्याच्या इंस्टाग्रामवर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे. या व्हिडिओमध्ये तो बर्फाच्छादित दऱ्यांमध्ये बसलेला दिसत आहे. व्हिडिओ शेअर करताना अभिनेत्यानं कॅप्शनमध्ये लिहिलं आहे, 'माझ्या, तुमच्या, आमच्या 'बॉर्डर २'ला इतके प्रेम दिल्याबद्दल तुम्हा सर्वांना खूप खूप प्रेम.'

**'बॉर्डर २'नं मोडले विक्रम :** व्हिडिओमध्ये, तो मोठ्यानं विचारतो, "आवाज कुठपर्यंत पोहोचला?" तो नंतर हसतो आणि म्हणतो, "तुमच्या मनापर्यंत. तुम्हाला माझा 'बॉर्डर' खूप आवडला. खूप खूप धन्यवाद. तुम्हा सर्वांना प्रेम." सनी देओल अभिनीत 'बॉर्डर २'नं बॉक्स ऑफिसवर जोरदार कामगिरी केली आहे, फक्त सहा दिवसांत चित्रपटानं २३१.८३ कोटींची कमाई केली आहे, अनेक मोठ्या ब्लॉकबस्टर चित्रपटांच्या पहिल्या सहा दिवसांच्या कलेक्शनला मागे टाकले आहे. 'छावा'नं सहा दिवसांत ११७.७५ कोटी, 'टायगर ३'नं ११६ कोटी, 'सुलतान'नं १९५.९० कोटी, 'टायगर जिंदा है'नं १९०.६२ कोटी, 'संजू'नं १८६.४१ कोटी, 'वॉर'नं १८०.३० कोटी आणि 'धुरंधर'नं १८०.२५ कोटी कमावले. 'बॉर्डर २' सातव्या दिवशी २५० कोटी क्लबमध्ये सामील होण्याची अपेक्षा आहे. सॅकनिल्कच्या मते, गुरुवार, २९ जानेवारी दुपारी ३ वाजेपर्यंत चित्रपटानं २.७ कोटी कमावले. संध्याकाळपर्यंत ही संख्या वाढण्याची अपेक्षा आहे.

**'बॉर्डर २'ची स्टार कास्ट :** 'बॉर्डर २' हा १९९७मध्ये जेपी दत्ता दिग्दर्शित ब्लॉकबस्टर चित्रपटाचा सीक्वेल आहे. या चित्रपटात सनी देओल, वरुण धवन, अहान शेट्टी आणि दिलजीत दोसांझ मेधा राणा, अन्या सिंग, मोना सिंग आणि सोनम बाजवा हे प्रमुख भूमिकेत आहेत. दरम्यान सनी देओलच्या वर्कफ्रंटबद्दल सांगायचं झालं तर तो पुढील महिन्यात त्याच्या आगामी चित्रपटाचे चित्रीकरण सुरू करणार आहे. या चित्रपटाची निर्मिती ए.आर. मुरुगदास आणि फरहान अख्तर संयुक्तपणे करत आहेत. चित्रपटाचे शीर्षक अद्याप जाहीर झालेले नाही. बालाजी गणेशा सनी देओलच्या आगामी चित्रपटाचे दिग्दर्शन करतील.

चित्रपटाची टीम रविवारी पूजा समारंभासाठी जमली होती. या चित्रपटाचे शूटिंग फेब्रुवारी २०२६ मध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे.

## प्रियांका चोप्रा आणि महेश बाबू अभिनीत 'वाराणसी' चित्रपट होईल 'या' दिवशी रिलीज

'आरआरआर' दिग्दर्शक एसएस राजामौली यांचा 'वाराणसी' हा चित्रपट सध्या खूप चर्चेत आहे. या चित्रपटाचं चित्रीकरण वेगवेगळ्या ठिकाणी केलं जात आहे. 'वाराणसी'मध्ये प्रियांका चोप्रा आणि महेश बाबू मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटाचं बजेट एका हॉलिवूड चित्रपटाप्रमाणे असणार आहे. हा चित्रपट १३०० कोटींमध्ये निर्मित केला जाणार आहे. चित्रपटाचे निर्माते के.एल. नारायण, एस.एस. कार्तिकेय आहेत. 'वाराणसी'चं संगीत दिग्दर्शन एम. एम. कीरवानी करणार आहेत. 'वाराणसी'च्या भव्य बजेटमुळं हा चित्रपट अधिक चर्चेत आला आहे. राजामौली दिग्दर्शित 'बाहुबली'चे दोन्ही भाग आणि 'आरआरआर' हे चित्रपट




तुफान चालले. भव्यतेच्या बाबतीत 'वाराणसी' या चित्रपटांच्या खूप पुढे असल्याचं म्हटलं जातंय. या चित्रपटाद्वारे पुन्हा एकदा प्रियांका चोप्रा भारतीय चित्रपटसृष्टीत पुनरागमन करत आहे. 'वाराणसी'च्या चित्रीकरणाच्या निमित्ताने प्रियांका अनेकदा अमेरिकेतून भारतात ये-जा करत असते.

**'वाराणसी' रिलीज डेट :** दरम्यान आता या चित्रपटाच्या रिलीजबद्दल सांगायचं झालं तर, हा चित्रपट ७ एप्रिल २०२७ रोजी रुपेरी पडद्यावर रिलीज होणार आहे. थोडक्यात प्रियांका आणि महेश बाबूच्या चाहत्यांना या चित्रपटासाठी खूप वाट पाहावी लागणार आहे. 'वाराणसी' मध्ये महेश बाबू आणि प्रियांका चोप्रा व्यतिरिक्त पृथ्वीराज सुकुमारन देखील असणार आहे. या चित्रपटामध्ये जोरदार ॲक्शन सीन्स प्रेक्षकांना पाहायला मिळतील. 'वाराणसी' मध्ये प्रियांका मंदाकिनीच्या भूमिकेत, महेश बाबू रुद्राच्या भूमिकेत आणि पृथ्वीराज सुकुमारन खलनायक कुंभाच्या भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटामध्ये प्रियांकाचा एक नवा अंदाज चाहत्यांना पाहायला मिळणार आहे.

**'वाराणसी' चित्रपटाबद्दल :** 'वाराणसी'ची कहाणी हजारो वर्षांपूर्वीची असून अंटार्क्टिकापासून आफ्रिका आणि भारतीय शहरापर्यंतच्या ठिकाणांसह अनेक खंडांचं दर्शन प्रेक्षकांना या चित्रटामध्ये मिळणार आहे. चित्रपटाच्या पब्लिसिटी मटेरियलनुसार, हा चित्रपट 'इंडियाना जोन्स' आणि 'जेम्स बॉन्ड'सारखा आहे. या चित्रपटामधील पहिले फुटेज हे नोव्हेंबर या महिन्यामध्ये रिलीज करण्यात आले होते. 'वाराणसी' चित्रपटाबद्दलची अधिक माहिती देण्यासाठी हैदराबादमधील रामोजी फिल्म सिटीमध्ये एक भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला, या कार्यक्रमासाठी चित्रपटामधील मुख्य स्टार्स आणि दिग्दर्शक उपस्थित होते. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर धमाल करेल असं अनेकजण सोशल मीडियावर पोस्ट शेअर करून म्हणत आहेत.

## 'धुरंधर'चा ओटीटीवर १० मिनिट रनटाईम कमी केल्यानं प्रेक्षक नाराज

**मुंबई :** 'धुरंधर' या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर धमाकेदार कमाई करून प्रेक्षकांचं मन जिंकलं आहे. आदित्य धर दिग्दर्शित हा चित्रपट ५ डिसेंबर २०२५ रोजी रुपेरी पडद्यावर रिलीज झाला होता. या चित्रपटानं ५०हून अधिक काळपर्यंत बॉक्स ऑफिसवर कमाई केली. आता ज्या प्रेक्षकांनी 'धुरंधर' चित्रपट पाहिला नसेल, त्यांच्यासाठी एक संधी चालून आली आहे. हा चित्रपट ३० जानेवारी २०२६ रोजी ओटीटीवर प्रदर्शित झाल आहे. 'धुरंधर' चित्रपट प्रेक्षकांना खूप पसंत आला होता. दरम्यान 'धुरंधर'ला आता ओटीटी प्लॅटफॉर्मवर सेन्सॉर करण्यात आले आहे. हा चित्रपट ए सर्टिफिकेटसह थिएटरमध्ये प्रदर्शित



झाला होता, परंतु आता प्रेक्षकांना ओटीटी प्लॅटफॉर्मवर सर्व दृश्ये पाहता येणार नाही.

**नेटफ्लिक्सवर लोक निराश झाले :** दर्शकांनी आता नेटफ्लिक्सवर टीका करण्यास सुरुवात केली आहे. नेटफ्लिक्सवर सध्या स्ट्रीम होत असलेल्या 'धुरंधर'मधील काही संवाद म्यूट करण्यात आले आहेत आणि अपशब्द काढून टाकण्यात आले आहेत. हा चित्रपट १० मिनिटे कमी करण्यात आला आहे. यामुळं प्रेक्षकांना निराशा झाली आहे, ज्यांना चित्रपट कोणत्याही कटशिवाय स्ट्रीम होण्याची अपेक्षा होती, परंतु तसे झाले नाही. इतरांनी १८+ स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्मवरील अशा निर्बंधांमागील तर्कावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. एका नेटफ्लिक्स यूजरनं लिहिलं, 'खूप निराशा झाली आहे @NetflixIndia. जेव्हा प्रत्येकजण अनसेन्सॉर आवृत्तीची अपेक्षा करत होता, तेव्हा तुम्ही हे का सेन्सॉर केले? 'ॲनिमल' आणि 'कबीर सिंग'मध्ये कोणतेही कट नसताना ए-रेटेड चित्रपट सेन्सॉर करणे हा एक विनोद आहे.' दुसऱ्या यूजरनं लिहिलं, 'तुम्ही १० मिनिटे कमी का केली आहेत?.' आता अनेकजण आपल्या प्रतिक्रिया सोशल मीडियावर शेअर करत आहेत.


**जगभरात १३०० कोटींहून अधिक कमाई :** 'धुरंधर' हा एक स्पाय ॲक्शन थ्रिलर आहे, ज्यामध्ये अनेक दृश्यांमध्ये अश्लील भाषा आहे. चित्रपटात अनेक क्शन सीक्वेन्स देखील आहेत. रणवीर सिंग, अक्षय खन्ना, संजय दत्त, आर. माधवन आणि अर्जुन रामपाल यांच्या उत्कृष्ट स्टारकास्टनं चित्रपटाला एक वेगळीच ओळख मिळवून दिली आहे. चित्रपटानं जगभरात १३०० कोटींहून अधिक कमाई केली आहे.

## घड्याळ नसतानाही माणूस अचूक वेळ कशी ओळखायचा ?

आजच्या जगात वेळ ही सर्वात मौल्यवान गोष्ट मानली जाते. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपण सतत घड्याळाकडे पाहत असतो. ऑफिस, कॉलेज, प्रवास, भेटीगाठी, कार्यक्रम सगळं काही वेळेवर चालतं. मोबाईलचा अलार्म वाजला नाही तर दिवसाची सुरुवातच विस्कळीत होते. पण एक प्रश्न अनेकांच्या मनात कधी ना कधी येतोच, जेव्हा घड्याळ नव्हतं, मोबाईल नव्हता, तेव्हा माणूस वेळ कशी ओळखत होता?

आज आपल्याला सेकंद, मिनिट आणि तास यांचा अचूक हिशोब मिळतो. पण हजारो वर्षांपूर्वीही लोक शेती करत होते, प्रवास करत होते, पूजा, व्यवहार आणि राजकारणही वेळेवर पार पडत होते. तेव्हा वेळ मोजण्याची पद्धत आधुनिक नव्हती, पण ती निसर्गाशी जोडलेली आणि अत्यंत अचूक होती.

**सूर्य हा पहिला वेळ मोजणारा साधन**



प्राचीन काळात सूर्य हा वेळ ओळखण्याचा सर्वात मोठा आधार होता. जमिनीवर रोवलेल्या काठीची सावली पाहून दिवसाचा कोणता भाग सुरू आहे, हे ठरवलं जायचं. सकाळी सावली लांब, दुपारी छोटी आणि संध्याकाळी पुन्हा लांब होत असे. या बदलावरून लोक कामांची वेळ ठरवत असत. त्यामुळे सूर्याला जगातील पहिलं नैसर्गिक घड्याळ मानलं जातं

**प्रहर पद्धत म्हणजे काय?**

आज आपण दिवसाचे २४ तास मानतो, पण जुन्या भारतीय पद्धतीत दिवस आणि रात्र मिळून आठ भाग केले गेले होते, ज्यांना प्रहर म्हटलं जायचं. दिवसाचे चार प्रहर आणि रात्रीचे चार प्रहर. एका प्रहराचा कालावधी साधारण तीन तासांचा होता. म्हणूनच मराठीत आजही दुपार, मध्यरात्र, पहाट असे शब्द वापरले जातात.

**रात्री वेळ कशी ओळखायची?**

दिवसा सूर्य मदतीला होता, पण रात्री आकाशाकडे पाहून वेळ ओळखली जायची. चंद्राची स्थिती, ताऱ्यांची हालचाल आणि विशिष्ट नक्षत्रांचे उगवणे यावरून अनुभवी लोक रात्रीचा वेळ सांगू शकत होते. ग्रामीण भागात ही पद्धत अनेक ठिकाणी आजही वापरली जाते.

**पाणी आणि वाळूने वेळ मोजण्याचे प्रयोग**

जगाच्या विविध भागात वेळ मोजण्यासाठी वेगवेगळ्या साधनांचा वापर झाला. पाण्याच्या पात्रातून ठराविक वेगाने पाणी वाहू देऊन वेळ मोजली जायची. याला जलघटिका म्हणतात. तसेच वाळूच्या घड्याळांचा वापर प्रवासात आणि समुद्री जहाजांवर मोठ्या प्रमाणावर केला जात असे.

**निसर्गाचे अलार्म**

घड्याळ नसतानाही निसर्ग स्वतः वेळेचा इशारा देत होता. पहाटे कोंबड्याचा आरव, सकाळी पक्ष्यांचा आवाज, संध्याकाळी वातावरणातील बदल यावरून लोक वेळेचा अंदाज लावत असत. निसर्गाशी जोडलेली ही जीवनशैली आजही अनेकांना आकर्षित करते.

आज घड्याळं अत्याधुनिक झाली आहेत. पण जुन्या काळातील वेळ मोजण्याची पद्धत पाहिली, तर ती केवळ साधी नव्हती, तर निसर्गाशी जोडलेली आणि विचारपूर्वक विकसित झालेली होती. आधुनिक तंत्रज्ञानामुळे वेळ हातात आली, पण त्या काळातील माणूस वेळेला निसर्गातून ओळखत होता, ही गोष्ट आजही आश्चर्यचकित करणारी आहे.




**मेष** – नोकरी-व्यवसायात नवीन दिशा मिळू शकते. आपणास आत्मविकासाची संधी मिळेल. कायदा मोडू नका.

**वृषभ** – तुमचे कार्यक्षेत्र व सामाजिक जीवन चांगले राहील. तुमच्या मेहनतीचा योग्य मोबदला मिळेल.आर्थिक फायदे मिळतील. आरोग्याबाबत जागरूक राहा.

**मिथुन** – मानसिक व शारीरिक आरोग्य चांगले राहील. खर्च वाढण्याची शक्यता आहे. तुमचा आत्मविश्वास वाढेल.

**कर्क** – आरोग्याच्या बाबतीत काही समस्यांचा सामना करावा लागू शकतो. तुमच्या मेहनतीचा योग्य मोबदला मिळेल.

**सिंह** – व्यवसायात नवा बदल वा संधी मिळेल. कुटुंबीयांशी नाते दृढ होईल. मानसिक शांतता मिळवण्याचा प्रयत्न करा.

**कन्या** – काही नवीन कौशल्य शिकण्याची संधी मिळू शकते. यशस्वी होण्यासाठी अतिरिक्त मेहनत करावी लागेल.

**तूळ** – प्रेम आणि नातेसंबंधात काही ठिकाणी वाद होऊ शकतात. जीवनात एखादी नवीन संधी येण्याची शक्यता आहे.

**वृश्चिक** – तुमच्यातील आंतरिक शक्ती ओळखून तिचा उपयोग करण्याची वेळ येईल. कुटुंबातील नातेसंबंध सुधारतील.

**धनु** – काही महत्त्वाचे निर्णय घेणे आवश्यक ठरेल. आरोग्याबाबत सतर्क राहावे. आपण आर्थिकदृष्ट्या मजबूत बनाल.मानसिक शांतता मिळवण्याचा प्रयत्न करा.

**मकर** – नोकरीत अडचणींना तोंड द्यावे लागेल. कुटुंबातील सदस्यांशी सुसंवाद राखणे महत्त्वाचे ठरेल. खरेदी कराल.

**कुंभ** – नोकरी-व्यवसायात प्रगती होईल, मात्र काहीसा तणाव आणि क्षुल्लक अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

**मीन** – तुमचे मानसिक आरोग्य उत्तम राहील. कामकाजात अडचणी येऊ शकतात, पण तुम्ही त्यावर मात करू शकता. आपण आर्थिकदृष्ट्या मजबूत बनाल.

### धावत्या रेल्वेतून पडून महिलेचा मृत्यू; तर सोबतचा एक गंभीर जखमी

पूर्णा तालुक्यातील फुकटगाव शिवारात शुक्रवारी (दि. ३० जानेवारी) सकाळी ७:३० वाजेच्या दरम्यान पनवेल एक्स्प्रेस रेल्वे डब्यातून पडून एका ३२ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. तर तिच्या सोबत असलेला एक युवक देखील पडून गंभीर जखमी झाला असल्याची घटना घडली आहे. भाग्यश्री अमोल देवतळे (वय - ३२ वर्ष, रा. असोली, ता. माहूर, जि. नांदेड) असं मयत महिलेचं नाव आहे. तर मिथून रमेश गवळी रा असोली असे जखमी युवकाचे नाव आहे.

# बारामतीत विमान अपघात; उपमुख्यमंत्री अजित पवारांसह पाच जणांच्या मृत्यूचा तपास सीआयडी करणार

**पुणे (शकील शेख) :** बारामती विमानतळावर बुधवारी सकाळी घडलेल्या भीषण विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. धावपट्टीच्या शेवटापासून अवघ्या २०० मीटर अंतरावर चार्टर्ड विमान कोसळले. या प्रकरणी बारामती तालुका पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद (ADR) करण्यात आली असून, पुढील तपास महाराष्ट्र गुन्हे अन्वेषण विभागाकडे (CID) सोपवण्यात येणार आहे. या अपघातात कॅप्टन सुमित कपूर, सहवैमानिक कॅप्टन शांभवी पाठक, वैयक्तिक सुरक्षा अधिकारी विदिप जाधव आणि विमान परिचारिका पिंकी माळी यांचा मृत्यू झालाय. घटनेनंतर सायंकाळी विमान अपघात तपास ब्युरो एएआयबी यांचे विशेष पथक घटनास्थळी दाखल होऊन फॉरेन्सिक तपासास सुरुवात करण्यात आलीय.

**तपास सीआयडी (CID) कडे वर्ग केला जाणार :** पुणे ग्रामीण पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, "बारामती तालुका पोलीस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. नियमानुसार हा तपास सीआयडी (CID) कडे वर्ग केला जाणार आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या अखत्यारीतील विमान अपघाताच्या



तापसाची सुत्रे ब्युरोने (AAIB) हाती घेतली आहेत. एएआयबी (AAIB) च्या प्राथमिक आणि तांत्रिक निष्कर्षांच्या आधारे पुढील चौकशी होणार आहे."

**एअर ट्रॅफिक कंट्रोलला अपेक्षित 'रीड-बॅक' देण्यात आला नाही :** बुधवारी सकाळी अजित पवार मुंबईहून बारामतीकडे रवाना झाले होते. ५ फेब्रुवारीला होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यात चार प्रचारसभांना संबोधित करण्याचा त्यांचा कार्यक्रम होता. राज्य सरकारने अपघातापूर्वीच्या घटनाक्रमाबाबत अधिकृत निवेदन जारी केलंय. निवेदनानुसार, 'लिअरजेट' प्रकारच्या विमानाला खराब दृश्यमानतेमुळे एकदा 'गो-अराऊंड' करून नंतर बारामती विमानतळावर उतरण्याची परवानगी देण्यात आली होती. मात्र उतरण्याची परवानगी मिळाल्यानंतर विमानाकडून एअर ट्रॅफिक कंट्रोलला अपेक्षित 'रीड-बॅक' देण्यात आला नाही. त्यानंतर काही क्षणांतच धावपट्टीच्या कडेला विमानाने पेट घेतला आणि अपघात घडला.

**मृतांचे मृतदेह बाहेर काढून रुग्णालयात पाठवले :** अधिकाऱ्यांनी सांगितले की, एनडीआरएफ आणि अन्य आपत्कालीन बचाव पथके घटनास्थळी पोहोचेपर्यंत स्थानिक नागरिकांनी मृतांचे मृतदेह बाहेर काढून रुग्णालयात पाठवले होते. त्यानंतर प्रादेशिक न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळेचे पथक घटनास्थळी दाखल होऊन अपघातस्थळ सुरक्षित करण्यात आले.



# Men In Blue Take Guard To Make History At ICC T20 World Cup

**New Delhi :** What does India have in its ranks? World No 1 batter Abhishek Sharma; World No 1 spinner Varun Chakravarty; Former World No 1 pace spearhead Jasprit Bumrah, who would well be retaining his spot at the top had he not been saddled with workload issues, not to mention a bevvy of all-rounders.

What India does not have? Fear, defeatist attitude, indiscipline, outfield inertia, doubts, a short tail and, well, a full stomach. This means they are young, hungry and happening. They also have a heady blend of veterans and flashy youngsters who have learnt their cricket in the nursery of the fast and furious IPL, but also have learnt the importance of stability.

**No RoKo but no Toko**

In the absence of Rohit Sharma and Virat Kohli, the team still has the petro charge to surge and soar unhampered. No RoKo? Worry not! No Toko either for these deserving and unstoppable youngsters who have married craft and hard work to intent!

But really! What's it with Team India? It is almost as if the elements have teamed up to help the Men in Blue make history at the ICC T20 World Cup, 2026. Let's count the positives: Above everything else, skipper Suryakumar Yadav has regained his form. From being Mr. 360 degrees to battling to stay in the crease, he has come into his old stunning psychedelics with the bat.

All players are performing to their optimum. Ishan Kishan is hitting as if he has no time to stand and stare. Harshit Rana is celebrating more often, both with bowling and batting, that too at supersonic speed. Bumrah is doing what he is used to, and othersare hitting to finish the game within 10 overs.

All this and more has been happening at the ongoing T20 series against New Zealand leading up to the World Cup. The bowling coach, Morne Morkel, says this young and happening team has an X factor which no other squad does.

**Scintillating Run-Up To World Cup**

The five-T20 series with New Zealand to prepare for the upcoming World Cup has quickly moved from being a learning experience. It comes across more like a teaching plan for visitors. The only sad part of this team is the fact



that the very talented Sanju Samson, picked with such big hopes, has failed to make a mark, going out cheaply from the plum posting as an opener.

In his last four T20 International innings against New Zealand, Samson has struggled with scores of 10 (7 balls), 6 (5 balls), a golden duck and 24. Consequently, he has managed only 40 runs across these three matches in the series thus far, even though the team management says "he is just one knock away" from cementing his place in the playing 11 of the World Cup, which is now just nine days away.

**The Big Hitters**

A word here on Kishan's ecstatic run thus far. After staying away two years from the T20s, Kishan announced his comeback in style with a scintillating 76 off 32 balls in the second T20 against the Kiwis and following it up with a quickfire 28 off just 13 balls. Incidentally, he made his fastest 50 in 21 balls, breaking the record of Abhishek Sharma.

Coming to Sharma, he is the rock of the pie and has a big role to play in the fortunes of Team India in the upcoming World Cup. What Team India has achieved over the years in this format is agility, power hitting and using the bowling unit in a manner that makes it the best in the world. What he needs to do is continue to be the X factor in the team and not be fathomed and packed off by the opposition. His yen for first ball six flirts with the team fortune, like it did in the fourth T20I against the Kiwis the other day. More on him later.

**Head Turners**

Kuldeep has had the unwavering support of his skipper and, mostly, repays the favour with crucial wicket-taking at a crucial time. He nibbles away at oppositions without being ruffled by rope treatments. His gritty spells often put the batsmen on backfoot. His T20I economy rate of 6.87 makes him one of India's most economical bowlers in the format. The golden-haired man from Kanpur speaks mostly by turning his arm and wrist to hurt opponents of all kinds.

Varun Chakravarty makes India's spin department more lethal than others, what with his versatile right-arm leg-spin bowling variations, including the carrom ball and googly. This architect of yore is now designing and blueprinting Indian hopes. The stealthy turns this tall spinner gives to the ball have earned him the title of mystery spinner, and he needs to live up to it in home conditions.

India's spin royalty has many more, like the match-winning left-arm Axar Patel and off-spin all-rounder Washington Sundar, providing all-round depth and a fearsome reputation.

**Master Blaster To The Fore**

What sets India's batting department apart from other equally well-endowed teams is the sheer variety, consistent performances and a collective hunger to win unitedly. Leading this philosophy is a young gun who stuns with every turn of the bat.

Abhi-six, Abhishake, Abhdhurandhar, Abhilator – call him whatever you want. He comes and fires all guns blazing without time for fear.

With his youth, confidence, and hunger for runs, Sharma is a delight in the crease, a swashbuckling left-handed batter whose fearless approach and elegant stroke play have made him a fan favourite pillar of Team India's limited-overs setup. Hailing from Amritsar, this young superstar has a remarkable journey, blending talent with sheer hard work and a strategic mind. He is truly a delightful talent to behold, destined to carry forward India's legacy of fearless cricket for years to come.

He holds the highest career strike rate in T20I history among batters with over 1000 runs, a staggering 190.62. Last year, he rose to No 1 in the world in the T20I format, becoming the youngest Indian to do so.

**All Bases Covered**

In short, India has all bases covered. Samson and Abhishek at the mouth to lay the foundation, Surya and Ishan to accelerate or save the situation as the next layer and 3 and 4 slots, the middle all done up with big hitters and stabilisers in Tilak Verma, Shivam Dube, Hardik Pandya and Axar Patel, and then Rinku Singh as the diminutive but high impact finisher who masterminds life in death overs.

Over to the bowlers with a three-man pace attack in Bumrah, Harshit and Arshdeep. And then there are Kuldeep, Axar and Varun to play as per ground conditions.

Squad: Suryakumar Yadav (C), Axar Patel (VC), Sanju Samson, Abhishek Sharma, Ishan Kishan, Shivam Dube, Tilak Verma, Hardik Pandya, Rinku Singh, Washington Sunder, Jasprit Bumrah, Harshit Rana, Arshdeep Singh, Kuldeep Yadav, Varun Chakravarty

Group A: India are paired with Pakistan, USA, Namibia, Netherlands

Fixtures

February 7: vs USA, Mumbai, 7 pm

February 12: vs Namibia, Delhi, 7 pm

February 15: vs Pakistan, Colombo, 7 pm


February 18: vs Netherlands, Ahmedabad, 7 pm.

# Quinton De Kock Rewrites History Books As South Africa Beat West Indies By Eight Wickets

**Hyderabad :** South Africa produced an impressive batting display in the fixture against the West Indies in the second T20I, completing the chase of 222 with 15 deliveries to spare. Wicketkeeper-batter Quinton de Kock, who reversed his retirement recently, was at the helm of the carnage, scoring 115 runs from 49 deliveries laced with ten sixes. The left-hander completed the century in just 43 balls and also scripted multiple records.

**Most T20 runs by a South African**

De Kock leads South Africa's T20 run charts with an impressive tally of 12,113 runs from 430 matches, scoring with an average of 31.46 at a strike rate of 139.10. His tally includes eight centuries and 81 fifties and has surpassed compatriot Faf du Plessis, who has scored



12,041 runs.

Also, he has become the second South African batter to score 12,000 T20 runs and the 11th overall. His century against the West Indies was also the third-fastest by a South African in T20Is. David Miller's 35-ball ton against Bangladesh in 2017 and Dewald Brevis' 41-ball effort against Australia last year are the top two fastest centuries in T20 cricket.

In a high-scoring affair played at the Centurion, Quinton amassed 115 runs while Ryan Rickelton played an unbeaten knock of 77 runs. The stellar show from the duo helped the team take down the target of 222 from 17.4 overs.

**सोशल मीडियावर ‘आक्षेपार्ह पोस्ट’ करणाऱ्याला ‘मनसे’कडून चोप**

सोशल मीडियाचा वापर करून राजकीय नेत्यांविरुद्ध गरळ ओकणाऱ्या एका तरुणाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्टाईलने धडा शिकवण्यात आला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या सुरज महेंद्र शिर्के या तरुणाची मनसे कार्यकर्त्यांनी नालासोपाऱ्यात चक्क धिंड काढल्याचा प्रकार समोर आला आहे.

# भारतातून गायब झालेल्या साता समुद्रापार असलेल्या तीन अमूल्य मूर्ती देशात येणार; त्या कोण परत करणार?

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

अमेरिकेतील प्रतिष्ठित स्मिथसोनियनचे राष्ट्रीय आशियाई कला संग्रहालयानं दशकांपूर्वी मंदिरांमधून बेकायदेशीरपणे काढून टाकण्यात आलेल्या दक्षिण भारतातील तीन ऐतिहासिक कांस्य मूर्ती भारताला परत करणार आहे. परत करण्यात येणाऱ्या तीन मूर्तींमध्ये 'शिव नटराज' (चोल काळ, सुमारे ९९०), 'सोमस्कंद' (चोल काळ, १२वे शतक) आणि 'संत सुंदरर विथ परवाई' (विजयनगर काळ, १६वे शतक) यांचा समावेश आहे. सर्व दक्षिण भारतीय कांस्य कला परंपरेचे उत्तम उदाहरण मानले जाते. या मूर्ती पूर्वी तामिळनाडूच्या मंदिरांमध्ये धार्मिक मिरवणुकींमध्ये वाहून नेल्या जात होत्या.



**संपूर्ण कहाणी सार्वजनिकरित्या प्रदर्शित होणार :** बुधवारी संग्रहालयाने जाहीर केले की, चोल काळातील 'शिव नटराज' पुतळ्यांपैकी एक भारत सरकारसोबतच्या करारानुसार दीर्घकालीन कर्ज म्हणून अमेरिकेत राहणार आहेत. या करारानुसार, संग्रहालय पुतळा प्रदर्शित करत राहील. ते त्याच्या इतिहासाची, बेकायदेशीरपणे काढून टाकण्याची आणि परत करण्याची संपूर्ण कहाणी सार्वजनिकरित्या शेअर करतील. संग्रहालयाने सांगितले की, "द आर्ट ऑफ नोइंग इन साउथ एशिया, आग्नेय आशिया आणि हिमालय" या प्रदर्शनाचा भाग म्हणून या पुतळ्याचा समावेश केला जाणार आहे, जेणेकरून त्याचा इतिहास आणि परत करण्याची संपूर्ण कहाणी सार्वजनिकरित्या प्रदर्शित होणार आहे.

**छायाचित्रांमध्ये तीन कांस्य मूर्ती उपस्थित होत्या :** संग्रहालयाने म्हटले आहे की, हा निर्णय त्यांच्या दक्षिण आशियाई संग्रहाच्या अनेक वर्षांपासून केलेल्या पद्धतशीर तपासणीचा परिणाम आहे. २०२३ मध्ये फ्रान्समधील पाँडिचेरी येथील फ्रेंच इन्स्टिट्यूटच्या फोटो आर्काइव्हजसोबत काम करणाऱ्या संशोधकांनी खातरजमा केली आहे की, १९५६ ते १९५९ दरम्यान तामिळनाडूच्या मंदिरांमध्ये काढलेल्या छायाचित्रांमध्ये तीन कांस्य मूर्ती उपस्थित होत्या.


**आंतरराष्ट्रीय संशोधन भागीदारांची या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका :** भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (ASI) ने त्यानंतर या निष्कर्षांचा आढावा घेतलाय. संग्रहालयाचे संचालक चेस एफ. रॉबिन्सन म्हणाले की, "आम्ही सांस्कृतिक वारसा जबाबदारीने आणि पारदर्शकपणे हाताळण्यास वचनबद्ध आहोत. या पुतळ्यांना परत करणे हे आमच्या नैतिक संग्रहालय पद्धतींचे प्रमाणपत्र आहे. दीर्घकाळ प्रशंसित शिव नटराज पुतळा प्रदर्शित करण्यास आम्हाला परवानगी दिल्याबद्दल आम्ही भारत सरकारचे आभारी आहोत." संग्रहालयाने सांगितले की, त्यांनी कराराला अंतिम स्वरूप देण्यासाठी भारतीय दूतावासाशी जवळून काम केले. संग्रहालयाची मूळ टीम, दक्षिण आणि आग्नेय आशियाई कला क्युरेटर आणि आंतरराष्ट्रीय संशोधन भागीदारांनी या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावली.

## अजितदादांच्या नावावर राजकारण चुकीचं, संजय राऊत संतापले; म्हणाले, "आरोप विनाअट..."

● मुंबई, विशाल कारंडे :

अजितदादांच्या जाण्याच्या धक्क्यातून महाराष्ट्र अजूनही सावरलेला नाही. कालच अजित पवार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मात्र, या दुःखद घटनेनंतरही त्यांच्या नावानं राजकारण सुरू असल्याची खंत शिवसेना (उबाठा) खासदार संजय राऊत यांनी बोलून दाखवत तीव्र नाराजी व्यक्त केली.

"अजितदादांचं जाणं हा त्यांच्या कुटुंबावर मोठा आघात आहे. मंत्रीबिंत्री सोडून द्या, दादांचे तळागाळातील कार्यकर्ते, सामान्य माणसं ज्यांचा अनेक कारणांनी अजितदादांशी संबंध आला, त्यांना बसलेला धक्का महत्त्वाचा आहे. अशावेळी पुढील १५ ते २० दिवस राजकीय चर्चा करणं सर्वस्वी चुकीचं आहे," असं राऊत म्हणाले.



**त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल** - ते पुढे म्हणाले, "आम्हीही तडफडलो, दादांवर आरोप करून काय मिळवलं? छगन भुजबळ, प्रफुल पटेल यांच्यावर आरोप झाले, तेही सुटले. केवळ श्रद्धांजली वाहू नका, जयंत्या करू नका. दादांवरचे आरोप विनाअट मागे घ्या. तीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. ही मागणी नाही, विनंती आहे."

भाजपावर टीका करताना राऊत म्हणाले, "अजित पवारांना श्रद्धांजली वाहण्यासाठी पान-पान जाहिराती दिल्या, कौतुकास्पद आहे. पण, याच भाजपानं दादांवर ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोप केला होता. काहीच सिद्ध झालं नाही. मोदींनी आरोप केले. अमित शाह यांनी सरकारचा प्रतिनिधी म्हणून श्रद्धांजली वाहिली. पंतप्रधानांनी उत्कृष्ट प्रशासक म्हटलं. याचा अर्थ दादा निर्दोष आहेत. मग आरोप मागे घ्या. ही अराजकीय मागणी आहे."


**चौकशीचं पुढं काय होतं?** - राऊत यांनी विमान अपघात प्रकरणी चौकशीची मागणी करत डीजीसीए आणि एटीसीवर प्रश्न उपस्थित केले. "डीजीसीए अंतर्गत पायलट, मेंटेनन्स, वैधता यावर नियंत्रण असतं. अहमदाबादमध्ये एअर इंडियाचं विमान कोसळलं होतं, त्यात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचं निधन झालं. अशा अपघातानंतर चौकशीची घोषणा होते, पण पुढे काय होतं?" असा सवाल त्यांनी केला.

"बारामती विमानतळावर रडार नाही, एटीसी नाही, पुरेसा स्टाफ नाही. फक्त एअर स्ट्रिप आहे आणि व्हीआयपी विमानं उतरतात. अजितदादांपासून गौतम अदानी ते शरद पवारांपर्यंत अनेक महत्त्वाचे लोक इथे येतात. मग अशा अपघाताला जबाबदार कोण? डीजीसीए काय करतं? याची सखोल चौकशी झाली पाहिजे. राज्यातील महत्त्वाचा माणूस आपण गमावला आहे. याची जबाबदारी डीजीसीएला घ्यावी लागेल," अशी मागणी संजय राऊत यांनी केली.

## छ. संभाजीनगर विमानतळावर प्रवाशाच्या बॅगमध्ये आढळले जिवंत काडतूस, गुन्हा दाखल

● छत्रपती संभाजीनगर, प्रथमेश चव्हाण :

दिल्लीच्या दिशेनं प्रवास करणाऱ्या प्रवाशाजवळ जिवंत काडतूस सापडल्याची घटना छत्रपती संभाजीनगर विमानतळावर उघडकीस आली. रमेशकुमार साखरणी असं या प्रवाशाचं नाव असून, सुरक्षा यंत्रणांनी तातडीनं त्याला ताब्यात घेऊन सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गेल्या काही दिवसांपासून रमेशकुमार हा जिल्ह्यातील पर्यटनस्थळांना भेट देऊन परतत असताना त्याच्याकडं काडतूस आढळून आले. हे काडतूस कुठून आले? कसे आले? याबाबत माहिती समोर आली नसून, तपास सुरू असल्याचं प्रभारी पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव यांनी सांगितलं.




**प्रवाशांकडं जिवंत काडतूस** - रमेशकुमार तिरथदास साखरणी (वय ६०) नॉर्थ वेस्ट एन सिटी, दिल्ली येथील रहिवासी असून मोबाईल व्यापारी असल्याची माहिती त्यानं पोलिसांनी दिली. याप्रकरणी ‘सीआयएसएफ’चे पोलीस उपनिरीक्षक हुनमान साहाय मीना यांनी तक्रार दिली. त्यानुसार, सदरील प्रवासी २८ जानेवारीला सकाळी ८ वाजून ४० मिनिटांनी चिकलठाणा विमानतळावर आला. त्यावेळी पोलीस उपनिरीक्षक हे कर्तव्य बजावत होते. सेक्युरिटी होल्ड भागामध्ये सुरक्षेच्या कारणास्तव प्रवाशांची तपासणी दरम्यान सदर प्रवासी रमेशकुमार याच्याकडं परवाना नसताना बंदुकीचं जिवंत काडतूस बाळगून असल्याचं आढळून आलं.

**गुन्हा दाखल होत तपास सुरू** - विमान प्रवास करण्याच्या उद्देशानं विमानतळ इमारतीत प्रवेश केला. याप्रकरणी भारतीय शस्त्र अधिनियमांतर्गत सिडको एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी प्रभारी पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक काळे हे पुढील तपास करत आहेत.

**देवदर्शनाला प्रवासी आला होता महाराष्ट्रात** - रमेशकुमार याच्या मुलाचा दिल्लीत मोबाईल विक्रीचा मोठा व्यवसाय असून, तो प्रवासी स्वतः एका इंग्रजी वृत्तपत्रातून सेवानिवृत्त झाला असल्याची माहिती पोलीस तपासात समोर आली. २५ जानेवारीला सांगलीमध्ये एका धार्मिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी तो महाराष्ट्रात आला होता. त्यानंतर भीमाशंकर, शिर्डी आणि घृष्णेश्वर येथील देवदर्शन करून २८ जानेवारीला दिल्लीला परत जाण्यासाठी तो निघाला होता. यादरम्यानच्या काळात त्यानं त्याच्याकडं असलेली हॅन्डबॅग काही ठिकाणी मंदिराच्या बाहेर ठेवली होती, अशी माहिती चौकशी दरम्यान त्यानं दिली.

## जिल्हा परिषद निवडणूक : बदललेल्या निवडणूक तारखांमुळे हजारो शिक्षक टीईटी परीक्षेला मुकण्याची भीती

● मुंबई, दिगंबर जाधव :

राज्यात झेडपी आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी मोठ्या प्रमाणावर शिक्षकांना निवडणूक ड्युटी लावण्यात आली आहे. यापूर्वी मतदानाची तारीख ५ फेब्रुवारी २०२६ अशी निश्चित होती. मात्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर निवडणूक कार्यक्रमात बदल करण्यात आला आणि मतदानाची तारीख 7 फेब्रुवारी जाहीर करण्यात आली. नेमकी याच कालावधीत टीईटी परीक्षा ७-८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आली आहे.

सध्या परीक्षेच्या संकेतस्थळावर लॉगिन करून पाहिल्यास काही शिक्षकांना परीक्षेची तारीख ७ तर काहींना ८ फेब्रुवारी अशी दिसत आहे. मात्र प्रत्यक्ष हॉल तिकीट मिळाल्यानंतरच खरी तारीख स्पष्ट होणार असल्यानं शिक्षकांमधील संभ्रम अधिकच वाढला आहे. कोल्हापूरचे शिक्षक विनोदकुमार भोंग यांनी सांगितलं, “ज्यांची परीक्षा ८ तारखेला आहे, त्यांना ७ तारखेला मतदान साहित्य जमा करून रात्री उशिरापर्यंत केंद्रावर थांबावं लागतं. अशा परिस्थितीत दुसऱ्या दिवशी दूरच्या परीक्षा केंद्रावर वेळेत पोहोचणं जवळपास अशक्य आहे.“

टीईटी ही परीक्षा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सर्व कार्यरत शिक्षकांसाठी ठराविक कालावधीत उत्तीर्ण होणं बंधनकारक आहे. ही परीक्षा वर्षातून मोजक्याच वेळा घेतली जाते. एक संधी हुकल्यास शिक्षकांना पुन्हा दीर्घ प्रतीक्षा करावी लागते. शिवाय, या परीक्षेचा थेट परिणाम शिक्षकांच्या सेवा सुरक्षितता, पदोन्नती आणि व्यावसायिक भवितव्यावर होतो. अनेक शिक्षकांना परीक्षा केंद्रे त्यांच्या कार्यस्थळापासून लांब मुंबई, पुणे किंवा इतर शहरी जिल्ह्यांत देण्यात आली आहेत. त्यामुळे एक दिवस आधी प्रवास, निवास व्यवस्था आणि मानसिक तयारी करणं अत्यावश्यक ठरतं. अशावेळी निवडणूक कर्तव्यामुळे परीक्षेला अनुपस्थित राहण्याची वेळ येणं ही विसंगत आणि अन्यायकारक बाब असल्याचं शिक्षक संघटनांचं म्हणणं आहे.


या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य आदर्श शिक्षक समितीनं राज्य निवडणूक आयोगाकडं विचार करण्याची मागणी केली आहे. टीईटी परीक्षेस बसणाऱ्या शिक्षकांना प्रवेशपत्र (Admit Card) सादर केल्यास ७ आणि ८ फेब्रुवारी या कालावधीत निवडणूक कर्तव्यातून तात्पुरती सवलत द्यावी किंवा त्यांच्या जागी पर्यायी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, अशी विनंती करण्यात आली आहे.

## भोस्ते घाटात ट्रकची कंटेनरला धडक

**ट्रक चालक गंभीर जखमी; ट्रकचा ब्रेक निकामी झाल्याने झाला अपघात**

● खेड, फरीद डावरे :

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील भोस्ते घाटात २९ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात घडला. गोव्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या कंटेनरला पाठीमागून येणाऱ्या ट्रकचा ब्रेक निकामी झाल्याने हा ट्रक कंटेनरवर आदळला. या अपघातात ट्रक चालक फैजाक जाकीर पिया (२४, रा. गुजरात) वाहनात अडकून गंभीर जखमी झाला.



या अपघाताच्यावेळी रत्नागिरी जिल्हा पोलिस अधीक्षक नितीन बगाटे हे रत्नागिरीकडे जात होते. त्यांनी प्रसंगावधान राखत तातडीने थांबून घटनास्थळी पोहोचलेल्या वाहतूक पोलिस व आपल्या सहकाऱ्यांसह बचावकार्य सुरू केले. पोलिस कर्मचारी यांच्या मदतीने जखमी चालकाला वाहनातून सुरक्षित बाहेर काढण्यात आले. जखमी चालकास नरेंद्र महाराज संस्थेच्या रुग्णवाहिकेतून सूरज हंबीर यांनी तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. पोलिस अधीक्षक व त्यांच्या पथकाच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला. मुंबई-गोवा महामार्गावर झालेल्या या अपघातामुळे गोव्याहून मुंबईच्या दिशेला वाहतूक बाधित झाली. यावेळी वाहतूक पोलिस कर्मचारी, खेडचे पोलिस निरीक्षक विवेक अहिर व सहकाऱ्यांनी वाहतूक सुरळीत केली.

## गोवा एक्स्प्रेसला जळगाव, भुसावळनंतर आता ‘या’ नव्या स्थानकावर थांबा

● जळगाव, सचिन कदम :

गोव्यातील वास्को द गामा आणि नवी दिल्लीतील हजरत निजामुद्दीन रेल्वे स्थानकांदरम्यान दररोज धावणाऱ्या लोकप्रिय आणि वेगवान गोवा एक्स्प्रेसला जळगाव, भुसावळनंतर आता आणखी एका नव्या स्थानकावर थांबा मिळाला आहे. रेल्वे प्रशासनाने प्रवाशांच्या सोयीसाठी हा थांबा प्रायोगिक तत्त्वावर मंजूर केला असून, त्याची अंमलबजावणी ३० जानेवारीपासून सुरू देखील झाली आहे. रेल्वेच्या या निर्णयामुळे महाराष्ट्राच्या सीमेलगत वसलेल्या बऱ्हाणपूर व परिसरातील हजारो रेल्वे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. खंडव्याचे खासदार ज्ञानेश्वर पाटील यांनी बऱ्हाणपूरला गोवा एक्स्प्रेसचा थांबा मिळावा, यासाठी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. प्रवाशांची वाढती संख्या, बऱ्हाणपूरचे व्यापारी व शैक्षणिक महत्त्व तसेच मध्य प्रदेश–महाराष्ट्र सीमावर्ती भागातील दळणवळणाची गरज लक्षात घेऊन त्यांनी हा मुद्दा वेळोवेळी रेल्वे मंत्रालयाकडे मांडला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना



यश आल्याने गोवा एक्स्प्रेसला बऱ्हाणपूर येथे थांबा मंजूर झाला आहे.नवीन वेळापत्रकानुसार १२७७९ वास्को द गामा–हजरत निजामुद्दीन ही गाडी दररोज दुपारी ०१.२९ वाजता बऱ्हाणपूर रेल्वे स्थानकावर दाखल होऊन पुढील प्रवासासाठी मार्गस्थ होईल. तर १२७८० हजरत निजामुद्दीन–वास्को द गामा ही गाडी दररोज सकाळी ०७.४९ वाजता बऱ्हाणपूर येथे थांबेल. या दोन्ही गाड्यांच्या थांब्यामुळे दिल्ली, गोवा तसेच उत्तर आणि दक्षिण भारताकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी बऱ्हाणपूर एक महत्त्वाचे स्थानक ठरणार आहे. यापूर्वी वास्को द गामा येथून सुटल्यानंतर हजरत निजामुद्दीनकडे जाणाऱ्या गोवा एक्स्प्रेसला जळगाव-भुसावळनंतर थेट खंडवा येथेच थांबा होता. मध्येच कुठेच न थांबणारी ही गाडी आता बऱ्हाणपुरला प्रवाशांची चढ-उतर करेल.

## प्रवासी सुरक्षेसाठी कडक निर्णय; मद्यपान करणाऱ्या एसटी चालकांवर तातडीची कारवाई करणार

● मुंबई, राकेश गायकवाड :

एसटी महामंडळातील चालकांच्या मद्यपानाच्या प्रकारांबाबत गंभीर दखल घेत राज्य परिवहन महामंडळाच्या मुख्यालयाने कडक कारवाईचे निर्देश दिलेत. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी २५ जानेवारीला परळ बसस्थानकाला अचानक भेट दिल्यानंतर ही कारवाईची चक्रे वेगाने फिरली. या भेटीदरम्यान चालक-वाहक विश्रांतीगृहांमध्ये मद्याच्या रिकाम्या बाटल्या आढळून आल्या. तसेच काही कर्मचारी कर्तव्यावर जाण्यापूर्वी मद्यपान केल्याचेही निदर्शनास आले. प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आल्याने राज्यातील सर्व आगारांत चालकांची कर्तव्यावर जाण्यापूर्वी ब्रेथ ॲनालायझर चाचणी अनिवार्य करण्याचे निर्देश देण्यात आलेत. कर्तव्यावर असताना मद्यपान करणाऱ्या चालकांविरुद्ध तातडीने आणि कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश मुख्यालयाकडून जारी करण्यात आलेत.

**संबंधित अधिकाऱ्यांना परिपत्रक पाठवून सूचनांची माहिती दिली :** प्रवासी सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत ही मोहीम अधिक काटेकोरपणे राबवली जाणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या यंत्र अभियंता (चालन) विभागामार्फत सर्व विभाग नियंत्रक, विभागीय कार्यशाळा आणि संबंधित अधिकाऱ्यांना परिपत्रक पाठवून या सूचनांची माहिती देण्यात आलीय. कर्तव्यावर जाण्यापूर्वी चालकाने मद्यपान केले नसल्याची खात्री करणे आता बंधनकारक करण्यात आले आहे.

**तपासणी अधिक कडक :** परिपत्रकानुसार, कर्तव्यावर जाणाऱ्या प्रत्येक चालकाची मद्यपानाबाबत खात्री करूनच त्याला ड्युटीवर पाठवावे,



ज्या वाहनावर चालकाची नेमणूक आहे, त्या वाहनासोबतच त्याची ब्रेथ ॲनालायझर चाचणी घ्यावी, वाहन परीक्षकांनी चालकाची तपासणी न करता कोणतेही वाहन बाहेर जाऊ देऊ नये, मद्यपान केल्याचे आढळल्यास संबंधित चालकाला तत्काळ कर्तव्यातून दूर ठेवून आगार व्यवस्थापकांना माहिती द्यावी, अशा स्पष्ट सूचना देण्यात आल्यात.

**आगार व्यवस्थापकांवर जबाबदारी :** अशा प्रकरणांमध्ये आगार व्यवस्थापकांनी स्वतः खातरजमा करून संबंधित चालकांविरुद्ध नियमानुसार शिस्तभंगाची तातडीची कारवाई करावी, असेही आदेशात नमूद करण्यात आलंय. याशिवाय मुख्यालयाकडून अचानक तपासण्या (सरप्राइज चेक) घेतल्या जाणार असल्याने सर्व आगारांनी या सूचनांची काटेकोर अंमलबजावणी करणे बंधनकारक करण्यात आलंय.

**प्रवासी सुरक्षेला प्राधान्य :** एसटी ही राज्यातील सर्वसामान्यांची जीवनवाहिनी मानली जाते. त्यामुळे चालकांची शारीरिक आणि मानसिक स्थिती सुदृढ असणे अत्यावश्यक आहे. मद्यपान करून वाहन चालविणे ही गंभीर बाब मानून महामंडळाने ‘शून्य सहनशीलता’चे धोरण अवलंबल्याचे या परिपत्रकातून स्पष्ट झालंय. या निर्णयामुळे प्रवाशांच्या सुरक्षेत वाढ होईल आणि एसटी सेवेत शिस्त आणि जबाबदारी अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केलीय.